सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. ७ फेब्रुवारी २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## सखोल अभ्यास केला, महाराष्ट्राच्या निवडणुकीत गडबड झालीय; राहुल गांधी-सुळे-राऊतांचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७नवी दिल्ली**



महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीतील दारुण पराभवानंतर महाविकास आघाडीतील काँग्रेसचे खासदार राहुल गांधी, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत या तीन नेत्यांनी नवी दिल्ली इथं पत्रकार परिषद घेत निवडणूक आयोगाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत काहीतरी गडबड झाली असल्यानेच आम्ही विचारलेल्या प्रश्नांना निवडणूक आयोगाकडून उत्तर दिलं जात नाही, असा आरोप राहुल गांधी यांनी केला आहे.

निवडणुकीत गैरप्रकार झाल्याचा आरोप करत राहुल गांधी म्हणाले की, महाराष्ट्रात पाच वर्षांत जितक्या नव्या मतदारांची नोंद झाली नाही, त्यापेक्षा अधिक मतदार शेवटच्या पाच महिन्यांत नोंदवले गेले. लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान ३९ लाख नवीन मतदारांची नोंदणी करण्यात आली. म्हणजे हिमाचल प्रदेशच्या लोकसंख्येपेक्षाही अधिक मतदार या कालावधीत नोंदवण्यात आले. हे मतदार नेमके आले कुठून? असा सवाल राहुल यांनी उपस्थित केला आहे.

सरकारच्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रातील प्रौढ लोकसंख्या ९.५४ कोटी इतकी आहे. मात्र निवडणूक आयोगाकडून सांगण्यात आलं आहे की महाराष्ट्रात ९.७० कोटी इतके मतदार आहेत. म्हणजे महाराष्ट्रातील एकूण प्रौढ लोकसंख्येपेक्षा मतदारांची संख्या अधिक असल्याचा दावा आयोगाने केला आहे. विधानसभा निवडणुकीत संध्याकाळी ६ वाजल्यानंतर तब्बल १२ टक्के मतदान वाढल्याचं निवडणूक आयोगाने सांगितलं आहे. आम्ही मागील काही दिवसांत महाराष्ट्र विधानसभा निवडणूक निकालाचा सविस्तर अभ्यास केला आहे. या निवडणुकीत काहीतरी गोंधळ नक्कीच झाला आहे. महाराष्ट्रातील मतदार याद्यांमध्ये अनियमितता आढळली आहे, असा आरोपही राहुल गांधी यांनी केला आहे.दरम्यान, लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीतील मतदारांची यादी फोटोसह आम्हाला देण्यात यावी, अशी आम्ही महाविकास आघाडीतील तीनही पक्ष निवडणूक आयोगाकडे मागणी करत आहोत. मात्र काहीतरी चुकीचं असल्यामुळेच आयोगाकडून आम्हाला मतदार याद्या दिल्या जात नाहीत, असंही राहुल गांधी म्हणाले.

**निवडणूक आयोग सरकारचे गुलाम : संजय राऊत**

ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत म्हणाले, जर देशातील निवडणूक आयोग जिवंत असेल तर त्यांनी राहुल गांधींच्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत. निवडणूक आयोग उत्तर देणार नाही कारण आयोग सरकारचा गुलाम झाला आहे. अतिरिक्त ३९ लाख मतदार कुठून आले. आता ते बिहारमध्ये जातील, दिल्लीतही काही दिसले. आता ते पुढे उत्तर प्रदेशातही जातील असा खोचक टोला संजय राऊत यांनी लगावला.

राहुल गांधी यांनी केलेल्या आरोपांवर निवडणूक आयोगाने प्रतिक्रिया दिली आहे. लेखी स्वरुपात उत्तर देणार असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे.

## 'तोच विनोद पुन्हा पुन्हा केला तर...; राहुल गांधींच्या आरोपावर सीएम देवेंद्र फडणवीसांचं एका वाक्यात उत्तर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७मुंबई**

लोकसभेचे विरोधी पक्षेनेते राहुल गांधी यांनी आज महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीवरुन निवडणूक आयोग आणि भाजपावर गंभीर आरोप केले. काँग्रेसचे खासदार राहुल गांधी, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राऊत या तीन नेत्यांनी नवी दिल्ली इथं पत्रकार परिषद घेत निवडणूक आयोगाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं आहे. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत काहीतरी गडबड झाली असल्यानेच आम्ही विचारलेल्या प्रश्नांना निवडणूक आयोगाकडून उत्तर दिलं जात नाही, असा आरोप राहुल गांधी यांनी केला, या आरोपाला आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ट्विट करून एका वाक्यात प्रत्युत्तर दिले आहे.



खासदार राहुल गांधी यांनी पत्रकार परिषद घेऊन निवडणूक आयोगावर केलेल्या आरोपावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका वाक्यात ट्विट करून प्रत्युत्तर दिले. 'तोच तोच विनोद पुन्हा पुन्हा सांगितला तर तेव्हा आपण हसत नाही, असं ट्विटमध्ये करत गांधी यांच्यावर निशाणा साधला आहे.

राहुल गांधी यांच्यासह खासदार सुप्रिया सुळे आणि संजय राऊत यांनी एकत्रितपणे पत्रकार परिषद घेतली. त्यानंतर काही वेळातच फडणवीसांनी सोशल मीडियात एक पोस्ट करत राहुल गांधींच्या आरोपांची हवा काढली. 'जब एक ही चुटकुला बार-बार सुनाया जाए तो उसपर हंसा नहीं करते!', असे ट्विट करत फडणवीसांनी राहुल गांधींना टोला लगावला आहे.

तसेच फडणवीसांनी मीडियाशी संवाद साधताना राहुल गांधींवर पलटवार केला. ते म्हणाले, राहुल गांधी जोपर्यंत पराभवाचे चिंतन करणार नाहीत आणि आपल्या मनाची खोटी समजूत काढून घेतील, तोपर्यंत त्यांना जनतेचे समर्थन कधीच मिळणार नाही.मतदार कुठून आले, कुणाची नावे वगळली, याची उत्तरे निवडणूक आयोगाने दिली आहेत. त्यामुळे त्याची वेगळी उत्तरे देण्याची गरज नाही. राहुल गांधींना हे माहिती आहे की, दिल्लीतील निकालानंतर त्यांचे तिथे नामोनिशाण राहणार नाही, हे त्यांना माहिती आहे. त्यामुळे निकालानंतर काय बोलायचे, कोणते नॅरेटिव्ह तयार करायचे, याची प्रॅक्टिस ते करत आहेत, असा टोलाही फडणवीसांनी लगावला.

## भाजपचे एक लाख कार्यकर्ते 'एसईओ' होणार; 'स्थानिक स्वराज्य'साठी पेरणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ७मुंबई**




स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा धुरळा कधीही उडायला सुरवात होऊ शकते. भाजप नेहमीच निवडणुकीच्या तयारीत असतो. विधानसभा निवडणुकीनंतर भाजपने स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत यश मिळवायचेच, यासाठी पेरणी सुरू केली आहे.

राज्यात १ लाख ९४ हजार विशेष कार्यकारी अधिकारी नेमण्यात येणार आहेत. याच नियुक्त्यांच्या आडून कार्यकर्त्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक जिंकण्याचे 'टार्गेट' देण्याचा प्लॅन भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आखला आहे.

शिर्डी इथं भाजपचे महाविजय अधिवेशन झाले. भाजपचे प्रदेशाध्यक्ष तथा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी २०२५ वर्षे हे कार्यकर्त्यांच्या निवडणुकीचे वर्ष असेल, असे म्हटले होते. महापालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती, नगरपालिका तसेच राज्यातील २७ हजार ग्रामपंचायतींच्या निवडणुका यावर्षी होतील. यात काही हजार कार्यकर्ते, तिसऱ्या आणि चौथ्या फळीतील नेते, कार्यकर्त्यांना लढविले जाईल, तरीही हजारो कार्यकर्ते पदांविनाच राहतील. त्यांची सोय करण्याचे काम आता हाती घेण्यात आले आहे.

राज्यात महायुती सरकारकडून १ लाख ९४ हजार विशेष कार्यकारी अधिकारी नेमण्यात येणार आहेत. भाजपला त्यातील ६० टक्के, तर मित्रपक्ष उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना आणि उपमुख्यमंत्री अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेसला प्रत्येकी २० टक्के पदे दिली जातील, अशी माहिती आहे. हिशोब पाहिल्यास, भाजपचे जवळपास लाखावर कार्यकर्ते 'एसईओ' होतील, असे दिसते.'एसईओं'च्या नियुक्तीचे अधिकार महसूल खात्याला आहेत. चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे हे खाते आहे. विविध प्रकारची प्रमाणपत्रे साक्षांकित करण्याचे अधिकार 'एसईओं'ना पूर्वी होते. त्यामुळे त्यांना फार भाव होता. काही वर्षापासून प्रमाणपत्रे स्वसाक्षांकित करण्याची पद्धत सरकारने आणली आणि 'एसईओं'चे महत्त्व संपले, ते केवळ नामधारी राहिले. पण गेल्या आठवड्यात महसूल विभागाने 'जीआर' काढून त्यांचे महत्त्व वाढविले आहे. महिनाभरात 'एसईओ'च्या नियुक्त्या केल्या जाणार आहेत. आम्ही फक्त सतरंज्याच उचलायच्या का? असा प्रश्न भाजपचे कार्यकर्ते करायचे. आता या कार्यकर्त्यांना 'एसईओ' करत रूबाब वाढवला जाणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांना पदांचे टॉनिक मिळणार आहे.

## टायगर अभी जिंदा है! आमची वज्रमूठ पक्षांतराच्या चर्चांवर ठाकरेंच्या खासदारांची एकी; तिघांची दांडी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मुंबई**



उद्धव ठाकरे गटातील सहा खासदार शिंदे गटात लवकरच प्रवेश करणार असल्याची बातमी होती. या चर्चेने राजकीय वर्तुळात खळबळ उडाली होती. ठाकरेंचे कोणते खासदार जय महाराष्ट्र करणार असे विचारले जात होते. ही चर्चा सुरू असतानाच ठाकरे गटाचे सर्व खासदार राजधानी नवी दिल्लीत एकत्र जमले. आम्ही सगळे एक आहोत. पक्षांतराच्या बातम्या निराधार आहेत. आमची वज्रमूठ आहे. टायगर अभी जिंदा है, अशा शब्दांत खासदार अरविंद सावंत यांनी ठाकरे गटातील एकी अधोरेखित केली. खासदार सावंत यांच्या दिल्लीतील निवासस्थानी पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी आठ खासदार उपस्थित होते. संजय दिना पाटील कामात व्यस्त असल्याने उपस्थित नाहीत असे सांगण्यात आले. आणखी दोन खासदार गैरहजर होते.

काल लोकसभेत शिवसेनेच्या कार्यालयाचे उद्घाटन झाले. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाला नवीन कार्यालय मिळाले. आम्ही या कार्यालयाचे उद्घाटन केले त्यावेळीही सर्व खासदार उपस्थित होते. आताही सर्व खासदार येथे उपस्थित आहेत. आम्ही मुद्दाम सर्वांना एकत्रित आणलं. आमची वज्रमूठ आहे. टायगर अभी जिंदा है. त्यांच्याकडून रोज पुड्या सोडल्या जात आहेत.टप्प्याटप्प्याने त्यांच्यातलीच माणसं तिकडं जाणार होती. त्यांच्यातलाच एक माणूस आमदारांना घेऊन जातोय अशी बातमी मध्यंतरी होती. त्याचं काय झालं. आता त्या बातमीवरून लक्ष वळवायचं असेल म्हणून आमच्यावर आले. आमच्या खासदारांबद्दल त्यांच्या निष्ठेबद्दल जनमानसात मनं कलुषित करण्याचा जो प्रकार सध्या सुरू आहे त्याचा मी निषेध करतो, असे खासदार सावंत म्हणाले.

**ठाकरेंचे ११ खासदार कोण ?**

आताच्या लोकसभा निवडणुकीत ठाकरे गटाचे संजय देशमुख, नागेश पाटील आष्टीकर, संजय जाधव, राजाभाऊ वाजे, संजय दिना पाटील, अनिल देसाई, अरविंद सावंत, भाऊसाहेब वाकचौरे आणि ओमराजे निंबाळकर हे नऊ खासदार निवडून आले आहेत. तसेच दोन खासदार राज्यसभेत आहेत. आता या ११ खासदारांपैकी कोण ठाकरेंची साथ सोडून जाणार याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

## 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजनेत ३० दिवसांत ५ लाख लाडक्या बहिणी कमी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७मुंबई**

लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना राज्यात आणली. या योजनेच्या माध्यमातून महायुतीने जोरदार प्रचार करत महिला मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला. मात्र निकालानंतर राज्यात पुन्हा महायुतीचं सरकार आल्यानंतर आता लाडकी बहीण योजनेवरून बरीच चर्चा सुरू आहे. नुकतेच महिला विभागाकडून जारी करण्यात आलेल्या आकडेवारीनुसार राज्यात जानेवारी महिन्यात २ कोटी ४१ लाख महिलांना लाडकी बहीण योजनेचा हफ्ता देण्यात आला. विशेष म्हणजे गेल्या महिन्याच्या तुलनेत हा आकडा तब्बल ५ लाखांनी कमी आला आहे.



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेमुळे सरकारच्या आर्थिक तिजोरीवर भार पडत असल्याचं बोललं जात होते. त्यानंतर या योजनेचा फेर आढावा घेण्यात आला. त्यातून अपात्र असणाऱ्या महिलांना वगळण्याचा निर्णय सरकारने घेतला. डिसेंबर महिन्यात लाडक्या बहिणींची संख्या २ कोटी ४६ लाख इतकी होती, ती जानेवारीत २ कोटी ४१ लाख एवढी झाली. लाडकी बहीण योजनेतून कमी झालेल्या ५ लाख बहिणींपैकी अनेकांचे वय ६५ वर्षाहून अधिक झाल्यानं त्यांना आता योजनेचा लाभ मिळणार नाही. या योजनेतील अटीनुसार २१ ते ६५ वयोगटातीलच महिलांना महिन्याला १५०० रूपये देण्यात येतात.दीड लाख बहिणींचे वय ६५ हून अधिक झाले, योजनेच्या अटीनुसार ६५ वर्षापर्यंतच योजनेचा लाभ घेता येतो. २ लाख लाडक्या बहिणी संजय गांधी निराधार योजनेचाही लाभ घेतात.

पुढील काळात नमो महिला सन्मान योजनेचा लाभ घेणाऱ्या लाभार्थी बहिणींनाही योजनेतून वगळणार असल्याची माहिती आहे

**अडीच कोटींचा आकडा ३० लाखांवर आणणार, विरोधकांचा दावा**

लाडक्या बहिणीचा अडीच कोटी पर्यंत गेलेला आकडा पंचवीस ते तीस लाखावर आणण्याचे प्लॅनिंग सुरू आहे. जाहिराती देऊन लाडक्या बहिणींची दिशाभूल करून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत मतदान घेण्याचा हा फंडा आहे असा दावा काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे.

दरम्यान, योजनेतील नियमाप्रमाणे ६५ वर्षावरील बहिणींना लाभ मिळू शकत नाही. घरात चारचाकी वाहन असलेल्या महिलांना योजनेचा लाभ मिळणार नाही. अनावधानाने किंवा नजरचुकीने या महिला योजनेत समाविष्ट झाल्या असतील तर त्या कमी झाल्या आहेत. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना थांबवण्याचा कुठेही हेतू नाही असं स्पष्टीकरण मंत्री उदय सामंत यांनी दिले आहे.

## महाकुंभात अग्नितांडव! आगीत अनेक तंबू जळून खाक; कारण अस्पष्ट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७प्रयागराज**



उत्तर प्रदेशातील प्रयागराज शहरात महाकुंभमेळा सुरू आहे. या मेळ्यातून धक्कादायक बातमी समोर आली आहे. या ठिकाणी आज पुन्हा आगीची घटना घडली. आगीची माहिती मिळताच अग्निशमन विभागाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. यानंतर आग आटोक्यात आणण्याच्या कामास सुरुवात झाली. ही घटना शंकराचार्य मार्गावरील सेक्टर १८ मध्ये घडली. या आगीत येथील अनेक तंबू जळून खाक झाले आहेत. मोठ्या परिश्रमानंतर आग नियंत्रणात आणण्यात आली.

या घटनेची माहिती मिळताच सरकारी यंत्रणा घटनास्थळी दाखल झाल्या. तंबूतील लोकांना बाहेर काढण्यात आले. आग कशामुळे लागली याची माहिती अद्याप समोर आलेली नाही. परंतु, खबरदारीचा उपाय म्हणून लोकांना येथून सुरक्षित ठिकाणी स्थलांतरीत केले जात आहे. खाक चौक पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक योगेश चतुर्वेदी म्हणाले, ओल्ड सिटी रोडवरील तुलसी चौकाजवळील एका कॅम्पमध्ये आग लागली. या आगीवर आता नियंत्रण मिळवण्यात आले आहे. अग्निशमन विभागाचे कर्मचारी वेळेवर पोहोचले. त्यामुळे आग आटोक्यात आणता आली.

याआधी महाकुंभमेळ्यातील सेक्टर २२ बाहेरील चमनगंज चौकीजवळ आग लागली होती. ही घटना ३० जानेवारी रोजी घडली होती. या आगीत १५ तंबू जळाले होते. या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मुख्य अग्निशमन अधिकारी प्रमोद शर्मा यांनी सांगितले होते की आग लवकर आटोक्यात आणली. रस्त्यांची कमतरता असल्याने अग्निशमन वाहनांना घटनास्थळी पोहोचण्यात अडचणी निर्माण झाल्या होत्या.

## विद्यार्थ्यांनो लागा तयारीला! mahassscboard.in. या अधिकृत वेबसाइटवर 'महाराष्ट्र बारावीचे वेळापत्रक २०२५' जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या बारावीच्या परीक्षेची तारीख जाहीर करण्यात आली आहे. त्यानुसार बारावीची लेखी परीक्षा परीक्षा ११ फेब्रुवारी २०२५ ते ११ मार्च २०२५ या कालावधीत घेतली जाणार आहे.

बोर्डाने २१ नोव्हेंबर २०२४ रोजी ारहर्ीीललेरीव.ळप. या अधिकृत वेबसाइटवर 'महाराष्ट्र बारावीचे वेळापत्रक २०२५' जाहीर केले आहे. महाराष्ट्रातील २०२५च्या बारावीच्या वेळापत्रकात परीक्षेच्या तारखा, दिवस, वेळ आणि विद्यार्थ्यांसाठी सामान्य सूचना यांचा उल्लेख आहे.

बोर्डाने बारावीच्या परीक्षेचे हॉल तिकीट अधिकृत वेबसाइटवर जाहीर केली आहे. शाळांनी ही हॉल तिकीट छापून, विद्यार्थ्यांमध्ये त्या तिकिटांचे वाटप केले पाहिजे. परीक्षेच्या सर्व दिवशी महाराष्ट्र बारावी २०२५ चे प्रवेशपत्र सोबत बाळगणे महत्त्वाचे आहे; अन्यथा विद्यार्थ्यांना त्यांची परीक्षा देता येणार नाही.

**२०२४ चे वेळापत्रक आणि निकाल**

गेल्या शैक्षणिक सत्रात चड्डडक्क्षए बोर्डाने ऑगस्ट २०२४ मध्ये महाराष्ट्र बारावीचा पुरवणी निकाल २०२४ जाहीर केला. त्यांनी १६ जुलै ते ९ ऑगस्ट २०२४ दरम्यान महाराष्ट्र बारावीच्या पुरवणी परीक्षा घेतल्या. बोर्डाने २१ मे २०२४ रोजी महाराष्ट्र बारावीचा निकाल २०२४ अधिकृत वेबसाइटवर जाहीर केला. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे गेल्या वर्षी इयत्ता बारावीच्या परीक्षा २१ फेब्रुवारी ते १९ मार्च २०२४ दरम्यान पेन आणि पेपर स्वरूपात घेण्यात आल्या. तर, गेल्या वर्षी बोर्डाने फेब्रुवारी २०२४ मध्ये महाराष्ट्र बारावीची हॉल तिकिटे जारी केली होती. महाराष्ट्र बारावीच्या २०२४ च्या परीक्षेच्या तारखा २९ ऑगस्ट २०२३ रोजी जाहीर झाल्या.

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. ७ फेब्रुवारी २०२५ शहर/ग्रामिण


# शिवसेना (उबाठा) व शिंदे गटात हाणामारी

## आतमध्ये घुसण्याचा प्रयत्न करीत असताना बाचाबाची

### आमच्या नेत्याविरुद्ध असा प्रकार सहन करणार नाही - संतोष बद्रे



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती–** शिक्षण मंत्री ना. दादा भुसे अमरावती दौऱ्यावर असताना गुरुवारला दुपारी शिवसेना शिंदे गट व शिवसेना (उबाठा) गटात वाद उफाळल्याने वातावरण तापले होते. जिल्हाधिकारी कार्यालयात ना. दादा भुसे पोहचल्यानंतरजिल्हाधिकाऱ्यांच्या कक्षात मिटिंग सुरु होती. दरम्यान या ठिकाणी शिवसैनिक सुद्धा जमा झाले होते.

त्यावेळी शिवसेना उबाठाच्या एका पदाधिकाऱ्याने आतमध्ये जाण्याचा प्रयत्न केला असता त्याला शिंदे सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी अडविण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे वादविवाद बाचाबाची सुरु झाली, पण, प्रकरण एवढ्यावर च थांबले नाही तर दोन्ही गटात हाणामारीझाल्याने काही वेळ खळबळ उडाली होती. र मात्र वेळीच तेथे उपस्थित पोलिसांनी लगेच स्थिती नियंत्रणात आणली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे व शिवसेना (शिंदे) गटातील वाद शिगेला पोहोचल्याचे आज अमरावतीमध्ये सुद्धा बघायला मिळाले. शिवसेना (शिंदे) गटाचे नेते व शिक्षणमंत्री दादा भुसे आज अमरावती दौऱ्यावर आले होते. स्थानीक जिल्हाधिकारी कार्यालय येथे त्यांनी अधिकाऱ्यांसोबत आढावा बैठक घेतली. तत्पूर्वी जिल्हाप्रशासनाचे वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. दादाजी भुसे जिल्हाधिकारी कार्यालयात जात असतांना त्यांच्या वाहनावर उबाठा शिवसेनच्या वतीने कापूसव सोयाबीन फेकण्यात आले होते. यानंतर उबाठाचे कार्यकर्ते जिल्हाधिकारी यांच्या दालना पर्यंत पोहोचले. यावेळी शिवसेना (शिंदे) मठाचे कार्यकर्ते त्याठिकाणी मंत्री दादा भुसे यांच्या स्वागतासाठी उपस्थित होते. दीम्ही शिवसेना पक्षाचे कार्यकर्ते आमने सामने आले होते. शिवसेना (उबाठा) कार्यकर्त्यांनी मंत्री दादा भुसे यांच्याविरोधात जोरदार घोषणा देण्यास सुरुवात केली. यावेळी शिवसेना (शिंदे) पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी त्यांना विरोध केला. एवढ्यावरच प्रकरण थांबले नाही. त्यानंतर ना. भुसे हे जिल्हाधिकाऱ्यांच्या दालनात बैठकीसाठी गेले आणि बैठक सुरु झाली. त्यावेळी अंजनगाव सुर्जीचे शिवसेना उबाठाचे उपजिल्हाप्रमुख महेंद्र दिपटे यांनी आतमध्ये घुसण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे शिवसेना शिदे गटवउबाठा पदाधिकाऱ्यांमध्ये शाब्दीक चकमक उडाली. पण, प्रकरण थांबले नाही. त्यानंतर दोन्ही गटाच्या काही पदाधिकाऱ्यांमध्ये मारहाण झाली. परंतु उपस्थित पोलीसांनी दोन्ही पदाधिकाऱ्यां ना सावरत परिस्थिती नियंत्रणात आणली. या घटनेमुळे जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात तणाव निर्माण झाला होता.

#### ...तर कुणालाही सोडणार नाही !

आमचे नेते ना. दादा भुसे यांची जिल्हाधिकाऱ्यांच्या कक्षात बैठक सुरु होती. त्यावेळी मी स्वतः, निशांत हरणेसह काही पदाधिकारी बाहेर जवळच होतो. त्यावेळी शिवसेना उबाठाचे पदाधिकारी आले. त्यापैकी महेंद्र दिपटे आतमध्ये घुसण्याचा प्रयत्न करीत होता. त्यावेळी आमची बाचाबाची झाली, पण तरीही तो ऐकत नसल्याने मी दोन चार लगावून दिल्या. यापुढे कुणीही आमच्या नेत्याच्या कार्यक्रमात किंवा नेत्याविरुद्ध अशा प्रकारचे कृत्य करून व्यत्यय आणण्याचा प्रयत्न करीत असेल तर तो मग कुणीही असो... कुणालाही सोडणार नाही, असा इशारा शिवसेना शिंदेगटाचे महानगर प्रमुख संतोष बद्रे यांनी दिला.

# अंजनगावसुर्जी बाजार समितीच्या सभापती अपात्रतेच्या आदेशाला स्थगनादेश



विदर्भ प्रजासत्ताक

दि.७अंजनगाव सुर्जी ११येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती ॲड. जयंत गुणवंतराव साबळे यांना उपनिबंधकांनी अपात्र घोषित केले होते. याविरोधात विभागीय सहनिबंधकांकडे दाखल केलेल्या याचिकेवर सभापतींच्या अपात्रतेच्या आदेशाला स्थगनादेश मिळाला आहे.


अंजनगाव सुर्जी बाजार समितीचे सभापती ॲड. जयंत साबळे यांना महाराष्ट्र कृषी उत्पन्न बाजार समिती नियम २०१७ चे १०(३) अंतर्गत सभापती म्हणून अपात्र करण्यात आले होते. यानिकाला विरोधात ॲड. जयंत साबळे यांनी विभागीय सहनिबंधक यांच्यासमोर अपिल दाखल केले. अंजनगाव सुर्जी तालुक्यात सहकार क्षेत्रातील कृषी उत्पन्न बाजार समिती, खरेदी-विक्री व किसान जिनिंग या सहकरी संस्थामध्ये एक हाती सत्ता स्थापित असून विरोधी गटात नैराश्यातून व अपयश पचवता न आल्याने वेगवेगळ्या मार्गाने सर्वच सहकारी संस्थांमध्ये तक्रारी करण्याचा सपाटा लावला आहे. त्याच माध्यमातून सहकार गटाला घेरण्याकरिता कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक प्रदीप गोमासे यांनी जून महिन्यात सभापती ॲड. जयंत साबळे यांना महाराष्ट्र कृषीउत्पन्न खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे निवडणूक नियम २०१७ चे नियम १० (३) अन्वये जिल्हा उपनिबंधक यांचे अपात्र करण्याची याचिका दाखल केली असता त्यावर दि.२२ जानेवारी रोजी अमरावती जिल्हा उपनिबंधक यांनी अपात्रतेचे आदेश पारीत केले होते.

त्यावर ॲड. जयंत साबळे यांनी विभागीय सहनिबंधक याच्याकडे अपिल दाखल केली. त्यामध्ये दि.५ फेब्रुवारीला अंतरिम स्थगनादेश प्राप्त झाल्याने तालुक्याच्या सहकार क्षेत्रात वर्चस्व राखणाऱ्या सहकार पॅनलमध्ये आनंद व्यक्त केला जात आहे. आज कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती पदी ॲड. जयंत साबळे हे पुन्हा सभापती पदावर आरूढ होणार आहेत.

अंजनगाव सुर्जी बाजार समितीत मागील कालावधित दडलेले अपहार शोधून काढण्याचे कार्य हाती घेतले होते. त्याला आडकाठी करण्याचा विरोधकांचा हा अशस्वी प्रयत्न होता. बाजार समितीच्या हिताच्या व प्रगतीच्या दृष्टीने पुढे वाटचाल करु. गैरव्यवहार व समितीचे नुकसान करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल.

– **ॲड. जयंत साबळे,** सभापती, कृऊबास, अंजनगाव सुर्जी.

# शेतकऱ्यांच्या अडचणीत भर ! फार्मर आयडीला सर्व्हर डाऊनचा फटका



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती –** शासनाने शेतकऱ्यांसाठी फार्मर आयडी सक्तीचे केले असून शेतकरी आपला आधार लिंक मोबाईल आधारकार्ड व ७/१२ घेऊन आधार सेंटर, सी.एस.सी. सेंटर व तलाठी कार्यालय अशा ठिकाणी धावपळ करून आपले फार्मर आयडी बनविण्यासाठी मागील दहा-पंधरा दिवसापासून प्रयत्न करीत आहेत. परंतु सर्व्हर डाऊन होत असल्यामुळे शेतकऱ्यांना दिवसभर ताटकळत राहावे लागत आहे.शेतकरी आयडी बनवतांना कधी सर्वर डाऊन, तर कधी आधार कार्डवरील माहिती परिपूर्ण असताना बहुतांश केंद्रावर गावे गायब झाल्याचे दिसून येत आहे.कधी शेतकरी फोटो दिसत नाहीत. त्यामुळे पुढील ७/१२ किंवा ओटीपी येणे थांबते. दरम्यान ऑपरेटर देखील खूप प्रयत्न करून सुद्धा नोंदी होत नाहीत त्यामुळे बऱ्याच शेतकऱ्यांना २०० ते २५० रुपये खर्च करूनही फार्मर आयडीपासून वंचित रहावे लागत आहे. याबाबत तलाठी कर्मचारी ऑनलाईन तांत्रिक बिघाड असल्याचे कारण पुढे करत आहेत. तो दूर करण्यासाठी महसूल विभागाने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

सर्वर डाउन मुळे जिल्ह्यातील विविध भागातील शेतकऱ्यांची नोंदणी होत नाही. यामुळे ते हैराण आहेत. पीएम किसानचा १९ वा हप्ता २४ फेबुवारी रोजी वितरित होत असून, फार्मर आयडी अभावीशेतकरी त्यापासून वंचित राहणार आहेत .

# अखेर चिखलदरा ठाणेदारासह ४ पोलिस सस्पेंड

### अहवालानंतर आयजी रामनाथ पोकळेचे आदेश

### रेयट्याखेडा महिला धिंड, मारहाण प्रकरण



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७चिखलदरा** –संपूर्ण राज्यात खळबळ माजवणाऱ्या रेयट्याखेडा प्रकरणी चिखलदरा पोलिस ठाण्याचे तत्कालीन ठाणेदार आनंद पिदुरकर तसेच दोन पोलिस कॉन्स्टेबल वएक महिला कॉन्स्टेबल अशा चौघांना निलंबित केले आहे. अमरावती विभागाचे आयजी रामनाथ पर्पोकळे यांनी हे आदेश जारी केले आहे. विशेष म्हणजे एचडीपीओ सिद्धेश्वर धुमाळ यांच्या अहवालाची दखल घेत चिखलदरा ठाणेदार आनंद पिदुरकर आणि इतर पाच पोलिस कर्मचाऱ्यांची बदली करून त्यांना पोलिस मुख्यालयी १ फेब्रुवारी रोजी अटॅचकेले होते. त्यानंतर पाच दिवसांनी त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

#### आदेश जारी. चौघे सस्पेंड

अहवाल मिळाल्यानंतर, अमरावती झोनचे आयजी रामनाथ पोकळे यांनी आदेश जारी करून चिखलदरा पोलिस ठाण्याचे एसएचओ आनंद उ पिदुरकर, पोलीस कॉन्स्टेबल दीपक सोनाळकर, भीमसिंग उईके, महिलाय कॉन्स्टेबल प्रमिला जामकर याचौघांनासस्पेंड करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, ७ जानेवारी रोजी मारहाणीचा रिपोर्ट दाखल केल्यानंतर ठाणेदारांसह तपास अधिकाऱ्यांनी वृद्ध महिलेची साधी चौकशी करणेदेखील योग्य मानले नाही. तपास अधिकाऱ्यांने पीडित महिला कुठे आहे हे शोधण्याचा प्रयत्नही केला नाही. १८ जानेवारी रोजी जेव्हा ही बातमी वर्तमानपत्रे आणि माध्यमांमध्ये येऊ लागली तेव्हा संपूर्ण राज्यात खळबळ उडाली होती. त्यामुळे कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत या चौघांवर निलंबनाची कारवाई करण्यात आल्याने पोलिस वर्तुळात खळबळ उडाली आहे.

उल्लेखनीय असे की, चिखलदरा तहसीलमधील रेयट्याखेडा गावात, ७७ वर्षीय महिलेवर जादूटोण्याचा आरोप लावून तिच्या चेहऱ्यावर काळेफासून गावातून धिंड काढली व मारहाण सुद्धा क रण्यात आली होती. या प्रकरणाने अमरावती जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण राज्यात खळबळ उडाली होत्ती. त्यामुळे या प्रकरणाचा तपास पोलिस अधीक्षकांनी अंजनगाव सुर्जीचे पोलिस उपविभागीय अधिकारी डॉ. सिद्धेश्वर धुमाळ यांच्याकडे सोपवला होता. त्यांनी पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांना अहवाल सादर केला होता. या अहवालात, चिखलदरा पोलीस ठाण्याचे ठाणेदार आनंद पिदुरकर आणि चार ते पाच पोलिस कर्मचाऱ्यांना त्यांच्या कर्तव्यात निष्काळजीपणा केल्याबद्दल दोषी आढळल्याचे नमुद केले होते.या अहवालावर प्रशासकीय कारवाई करण्याचा अधिकार फक्त आयजींना आहे, म्हणून हा अहवाल पोलिस अधीक्षकांनी त्यांना सुपूर्द केल्यानंतर प्रथम बदली आणि आता पाच दिवसांनी ६ फेब्रुवारीला ठाणेदारांसह चौघांना सस्पेंड करण्यात आले आहे.

# १,६६८ जेष्ठ वयोवृद्धांना तिर्थदर्शनाची आस

### चार महीन्यांपासून जिल्ह्यातील वृद्ध वाट पाहत

### अयोध्याकरिता सर्वाधिक ९३९ भक्तांची नोंदणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती–**

मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजने अंतर्गत नोंदणी करण्यात आलेल्या जिल्ह्यातील १,६६८ जेष्ठ वयोवृद्ध गत चार महिन्यांपासून तिर्थ दर्शनाच्या प्रतिक्षेत आहेत. राज्यस्तरावरुन या योजनेची अंमलबजावणी थांबविल्याची माहिती आहे. परंतु या भक्तांना अखेर तीर्थ दर्शन केव्हा होणार असा प्रश्न आता उपस्थित केल्या जात आहे.

जेष्ठ नागरीकांचे तिर्थयात्रा करण्याचे स्वप्न पूर्ण व्हावे या उद्देशाने विधानसभा निवडणुकीपूर्वी राज्य शासनाने मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना सुरू केली. सर्व जाती धर्मातील ६० वर्षावरील जेष्ठ नागरीकांना निशुल्क दर्शनाकरिता पात्र करण्यात आले. शासनाकडून भारतातील ७३ तर महाराष्ट्रातील ६६ तिर्थ ठिकाण निश्चित करण्यात आले. १४ जुलै २०२४ ला शासन निर्णय निर्गमित केल्यानंतर राज्यभर अशा जेष्ठ नागरिकांची नोंदणी सुरू करण्यात आली. जिल्हास्तरावर १,६६८ जेष्ठ नागरिकांची तिर्थ दर्शनाकरिता निवड करण्यातआली. मध्येच विधानसभा निवडणुका लागल्या आणि या योजनेला बेक बसला. निवडणुकीनंतर या जेष्ठांना तिर्थ दर्शनाचा लाभ मिळेल या आशेवर लाभार्थी होते.

निवडणुक संपुन दोन महिने लोटले आहेत. परंतु अद्यापही या योजनची आचारसंहिता संपली नाही. पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली या निवड यादीतमा मंजुरातादेणे गरजेचे असताना वाबाबत पालकमंत्र्यांची बैठक झाली नाही. त्यामुळेया योजनेतीलालाभार्थ्यांना आता दर्शनाची आस लागली आहे. आणखी किती दिवस प्रतीक्षा करावी लागेल असा प्रश्न उपस्थित होत आहे.

#### त्वरीत लाभ मिळावा



मुख्यमंत्री तिर्थदर्शन योजने अंतर्गत पात्र ठरलेल्या १६६८ जेष्ठ वयोवृध्द नागरीकांना चार महिने लाटत असताना तिर्थ दर्शनाकरिता पाठविण्यात आले नाही. पालकमंत्र्यांच्या बैठकी अभावी लाभार्थी या योजनेपासून वंचित असल्याने याबाबत मुख्यमंत्री, पालकमंत्री, सहाय्यक आयुक्त समाजकल्याण यांना निवेदन देण्यात आले आहे. तिर्थयात्रा योजनेचा नागरीकांनी त्वरित लाभमिळावा अशी मागणी केली आहे.

– पंकज मेश्राम, सरचिटणीस, जिल्हा कॉंग्रेस कमेटी.

#### तिर्थक्षेत्र निहाय जेष्ठ भक्तांची नोंदणी

अयोध्या ९३९, बुद्धगया ३७९, वैष्णोदेवी २५४, अजमेर १६, पंढरपूर ५७, वाराणसी २३ अशा १६६८ भक्तांनी नोंदणी केली आहे.

# विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटर अंतर्गत घेण्यात आलेल्या शोधनिबंध लेखन व सादरीकरण स्पर्धेचा निकाल जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती–** महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमधील संशोधक वृत्तीच्या विकासाला चालना मिळावी, संशोधनात त्यांना लिंगभाव दृष्टिकोनाचा उपयोग करता यावा, तसेच नवीन संशोधक कल्पना आणि त्यांचे उपयोजन यांचा तार्किक पद्धतीने आणि सर्जनशील उपयोजन करण्यासाठी विद्यार्थ्यांना यामुळे सहकार्य होऊ शकेल, या दृष्टीने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील वुमेन्स स्टडीज सेंटर अंतर्गत विद्यापीठातील शैक्षणिक विभाग व विद्यापीठाच्या सर्व संलग्नित महाविद्यालयातील शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांसाठी शोधनिबंध लेखन व सादरीकरण स्पर्धा आयोजित करण्यात आली.या स्पर्धेसाठी स्त्रिया आणि बेरोजगारिता, लिंगभाव संवेदनशीलता विकासातील अडचणी, पुरुषत्त्वाचे पुरुषांवर होणारे परिणाम, स्त्रीवादाविषयी असणाऱ्या गैरसमजांमागील कारणे, ख्र्क्रएच्च्क्ष्त्रअ समुदायाच्या जाणीव-जागृतीचे उपाय असे पाच विषय देण्यात आले होते. या शोधनिबंध लेखन व सादरीकरण स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदविला होता. या स्पर्धेतील आलेल्या शोधनिबंधांचे परीक्षकाकडून परीक्षण करण्यात आले. त्या आधारे तीन क्रमांक निवडण्यात आले आहेत.



या स्पर्धेत दादासाहेब धनाजी नाना चौधरी समाजकार्य महाविद्यालय, मलकापूर, जि. बुलडाणा येथील गजानन ज्ञानेश्वर व्यवहारे यांचा प्रथम क्रमांक आला असून याच महाविद्यालयातील रोहन रामेश्वर अंभोरे यांचा द्वितीय क्रमांक आला. विधी महाविद्यालय, अकोला येथील वृषाली संजय इंदाने यांचा तृतीय क्रमांक आला. शोधनिबंध लेखन व सादरीकरण स्पर्धेतील सर्व क्रमांकांना ग्रंथ भेट देण्यात येणार आहे. या शोधनिबंध लेखन व सादरीकरण स्पर्धेतील निबंधांचे परीक्षण श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती येथील सहयोगी प्राध्यापक व समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. सुनिता धोपटे यांनी केले.

# आरटीई प्रवेश प्रक्रिया ४३० प्रवेशासाठी १० फेब्रु. ला लॉटरी

**विदर्भ प्रजासत्ताकदि.७ अमरावती** जिल्ह्यात आरटीईच्या २ हजार ४०३ जागांकरिता ८ हजार २०४ पाल्यांचे ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले आहेत. या दाखल अर्जाची पुणे येथे १० फेब्रुवारी रोजी लॉटरी काढले जाणार आहे. जिल्ह्यात २२५ शाळांमध्ये २ हजार ४३० जागांकरिता ११आरटीई अंतर्गत प्रवेश प्रक्रिया राबविली जात आहे. जिल्ह्यात १४ जानेवारी ते २ फेब्रुवारी दरम्यान ऑनलाइन अर्ज स्विकारण्यात आले. यामध्ये ८ हजार २०४ प्रवेश अर्ज प्राप्त झाले आहेत. ६ फेब्रुवारी पर्यंत अर्जाची पडताळणी करण्यात आली. सोमवारी, १० जानेवारीला सकाळी वाजतामहाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण) पुणे येथे लॉटरी काढण्यात येणार आहे. सदर सोडतीचे थेट प्रक्षेपण व्ही.सी. द्वारे करण्यात येणार आहे. पालकांना देखील व्ही.सी. ची लिक उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्यामुळे ते या लॉटरी प्रक्रियेत सहभागी होऊ शकणार आहे. ८ हजार २०४ पाल्यांपैकी लॉटरीमध्ये कोण नशिबवान ठरतो याची उत्सुकता पालकांना लागली आहे.

# किरण पातुरकर एमआयडीसी असोसिएशनचे सहाव्यांदा अध्यक्ष




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती** – येथील एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष म्हणून किरण पातुरकर यांची सहाव्यांदा निवड करण्यात – आलेली आहे.अमरावती एमआयडीसी असोसिएशनच्या २०२५–२८ या वर्षाकरीता बिनविरोध निवड झालेल्या कार्यकारिणीची पहिली सभा असोसिएशनच्या कार्यालयात बुधवारी (ता. पाच) पार पडली. या सभेत किरण पातुरकर यांची सर्वानुमते सहाव्यांदा कार्यकारिणीच्या अध्यक्षपदी सदस्यांनी निवड केली.

**निवड झालेली कार्यकारिणी पुढीलप्रमाणे आहे.** अध्यक्ष–जगदीश (किरण) विष्णुपंतपातुरकर, उपाध्यक्ष–पुरुषोत्तम गिरधारीलाल बजाज, अनिल रामचंद्रजी माधोगढीया, दिलीप लक्ष्मीनारायण अग्रवाल (डी. के.), परेश जेठालाल राजा, कोषाध्यक्ष–अशोक शामलाल आग्वाल (गोयल), सचिव आशिष चंद्रशेखर सावजी, सहसचिव प्रकाश लक्ष्मीनारायणजी राठी, सहसचिव दिपक रोहतासजी अग्रवाल, जनसंपर्क अधिकारी बंटी प्रेम जगमलाणी, कार्यकारी सदस्य कमलेश लक्ष्मीनारायण डागा, विजय जयकृष्ण मोहता, राजेंद्र गोवर्धनदास अग्रवाल, नंदकिशोर रामचंद्रजी अग्रवाल, महेश सुदामाराम बत्रा, सचीन मनोहरराव जाधव, हर्षवर्धन नरेश वर्मा, मुकेश रामदेव अग्रवाल, राजेश मोहनलाल अग्रवाल,अजय नानाजी पवार, गजानन बारोटकर यांचा समावेश आहे. अमरावतीच्या उद्योगासंबंधी सर्व त्रास व अडचणी सोडविण्याचा संकल्प या बैठकीत करण्यात आला. अमरावती शहरात लवकरात लवकर आयटी पार्क उभारण्यासाठी तसेच ग्रामोद्योग करणाऱ्या सर्व महिला उद्योजकांकरीता लहान लहान प्लॉट करण्याचा संकल्प या बैठकीत करण्यात आला. सोबतच अमरावती शहराला औद्योगिक शहर आणि गुंतवणुकीचा हब बनविण्याचा संकल्प या बैठकीत करण्यात आला. सर्व नव उद्योजकांना रोजगार मागणाऱ्यांना रोजगार देणारे उद्योजक बनविण्यास सक्षम करण्याची बाब यावेळी किरण पातुरकर यांनी अधोरेखित केली.

# शरीरसौष्ठव स्पर्धेत राहुल कांबळे 'महावितरण श्री'

## अतितटीच्या लढतींमुळे राज्यस्तरीय क्रीडास्पर्धेला मोठा प्रतिसाद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती–** वीजसेवेच्या धकाधकीचे दैनंदिन कामकाज सांभाळून शरीराला सुडौल व सुबद्ध आकार देत शरीरसंपदा कमावणाऱ्या महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेतील शरीरसौष्ठव स्पर्धेत प्रेक्षकांची मने जिंकत वाहवा मिळवली. यात कोल्हापूर परिमंडलाचे राहुल विजय कांबळे यांनी पहिला 'महावितरण श्री'चा किताब पटकावला.

दरम्यान, बारामती येथील विद्यानगरी प्रतिष्ठानच्या क्रीडा संकुलात सुरु असलेल्या महावितरणच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा अतितटीच्या लढतींमुळे रंगतदार होत आहे. सांघिक कामगिरीमध्ये पहिल्या दिवशी पुणे–बारामती संघाने वर्चस्व ठेवत आगेकूच सुरु केली.

महावितरणच्या क्रीडास्पर्धेत यंदा प्रथमच शरीरसौष्ठव स्पर्धेचा समावेश करण्यात आला. बुधवारी (दि. ५) रात्री



विविध वजनगटात शरीरसौष्ठव स्पर्धा झाली. यामध्ये तब्बल ३१ कर्मचाऱ्यांनी सहभाग घेत आश्चर्याचा धक्का दिला. या स्पर्धेत पिळदार शरीरयष्टीचे दमदार प्रदर्शन करीत कोल्हापूरच्या राहुल विजय कांबळे यांनी 'महावितरण श्री'चा किताब पटकावला. त्यांच्यासह विविध वजनगटातील विजेते व उपविजेत्यांना पुणे प्रादेशिक संचालक श्री. भुजंग खंदारे, मुख्य अभियंता सर्वश्री धर्मराज पेठकर, स्वप्निल काटकर, चंद्रमणी मिश्रा, सुनील काकडे, मुख्य महाव्यवस्थापक (मासं) श्री. भुषण कुलकर्णी, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. संजय ढोके यांच्याहस्ते पदक व प्रशस्तिपत्र देऊन गौरविण्यात आले. शरीरसौष्ठव स्पर्धेमध्ये वजनगटनिहाय विजेते व उपविजेते पुढीलप्रमाणे – ६५ किलो– सुनील सावंत (कल्याण–रत्नागिरी) व विशाल मोहोळ (पुणे–बारामती), ७० किलो– अमित पाटील (कोल्हापूर) व मोहम्मद जरीन शेख (अकोला–अमरावती), ७५ किलो– प्रवीण छुनके (कोल्हापूर) व नामदेव शिंदे (नाशिक–जळगाव), ८० किलो– राहुल कांबळे (कोल्हापूर) व दिनेश धाडे (नाशिक–जळगाव), ९० किलो– अपूर्व शिर्के (कल्याण–रत्नागिरी) व गौरव पोवार (कोल्हापूर) आणि ९० किलोवरील सलमान मुंडे (कोल्हापूर).


सांघिक कामगिरीत पुणे–बारामती संघाची आगेकूच– महावितरणच्या क्रीडास्पर्धेत मागील दोन वर्ष अजिंक्यपदाचे मानकरी झालेले पुणे–बारामती संघाने पहिल्याच दिवशी आगेकूच सुरु ठेवली आहे. या संघाने पहिल्या दिवशी ३ सुवर्ण तर २ रौप्यपदक जिंकले. तर मुख्य कार्यालय–भांडूप संघाने २ सुवर्ण जिंकले.

# बसमधील चिल्लरचा वाद आता संपणार, स्मार्ट व्यवहाराला झाली सुरुवात

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती** परिवहन महामंडळाने तिकिटाच्या दरात वाढ केली. या वाढीमुळे सुट्ट्या पैशावरून वाहक आणि प्रवाशांमध्ये वाद होऊ लागले. याची दखल परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी घेऊन यूपीआय पेमेंटचे ऑप्शन दिले आहे. बसमध्ये ऑनलाइन ऑप्शन दिल्याने प्रवाशांना सोयीचे झाले असून, प्रवासी त्याला भरघोस प्रतिसाद देत आहेत.

'लालपरी'तील चिल्लरचा वाद ही नित्याचीच बाब आहे. त्यात मागील आठवड्यात महामंडळाने १४.९५ टक्के तिकिट दरात वाढ केल्याने बहुतांश



तिकिट ११, २१, ३१, ४१ अशा प्रकारचे झाले आहेत. त्यामुळे चिल्लरचे वाद आणखीणच वाढले आहेत. यावर तोडगा म्हणून महामंडळाने यूपीआय पेमेंटचे ऑप्शन सुरू केले आहेत. वाहकाकडे अँड्रॉइड इलेक्ट्रॉनिक तिकिट इशू मशीन (ईटीआयएम) दिले आहे. या मशीनच्या माध्यमातून यूपीआय पेमेंटद्वारे तिकिट काढता येत आहे. त्यामुळे सुट्ट्या पैशांचा वाद टाळण्यास मदत होत आहे.ज्याला युपीआय पेमेंट करायचे असते त्यांनी वाहकाला तसे सांगायचे ते मशीनमध्ये युपीआय सिलेक्ट करून तिकिट काढतात त्यानंतर प्रवाशाला युपीआयद्वारे पैसे देता येतात. याचा प्रवाशांना फायदा होत आहे.

# ग्रामविकास व पंचायत राज मंत्र्यांनी घेतला अमरावती विभागाचा आढावा

## प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकुलांची कामे गतीने पूर्ण करावीत– –ग्रामविकास राज मंत्री जयकुमार गोरे

### – अपूर्ण घरकुले पूर्ण करण्यासाठी सर्वंकष प्रयत्न करा
### भुमीहीन लाभार्थ्यांना गायरान, गावठाण जमीनीवर घरकुल
### प्रत्येक तालुक्यात 'उमेद मार्ट' विक्री केंद्राची स्थापना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती–** प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा दोन अंतर्गत अमरावती विभागाला ३ लाख १६ हजार ३३९ उद्दिष्ट आहे. आतापर्यंत २ लाख ६९ हजार ६१ घरकुलांना मंजूरी देण्यात आली आहे. यानुषंगाने समाजातील प्रत्येक गोर–गरीब घटकाला हक्काचे घर मिळावे, यासाठी घरकुलांच्या कामांना गती देऊन उद्दिष्ट पूर्ण करावे, असे निर्देश राज्याचे ग्रामविकास व पंचायत राज मंत्री जयकुमार गोरे यांनी संबंधित यंत्रणांना दिले.

अमरावती येथील विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित विभागीय बैठकीत मंत्री श्री. गोरे यांनी विविध आवास योजनासंबंधी अमरावती विभागाचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. ग्रामविकास व पंचायत राज विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, विभागीय आयुक्त श्वेता सिंघल, अपर आयुक्त गजेंद्र बावणे, उपायुक्त संतोष कवडे, राजीव फडके तसेच जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र (अमरावती), मंदार पत्की (यवतमाळ), वैभव वाघमारे (वाशिम), बी. वैष्णवी (अकोला), गुलाब खरात (बुलडाणा) यांच्यासह कार्यान्वयन यंत्रणांचे प्रमुख अधिकारी यावेळी उपस्थित होते.

ग्रामीण भागातील प्रधानमंत्री आवास योजनांच्या सद्यस्थिती व अंमलबजावणीची माहिती घेऊन श्री. गोरे म्हणाले की, प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा एकमध्ये विभागात वर्ष २०२२ अखेरपर्यंत २० हजार ५९४ घरकुले अपूर्ण आहे. तसेच प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण टप्पा दोनमध्ये (वर्ष २०२४–२५ अखेर) २ लाख ६९ हजार ६१ घरकुले अपूर्ण आहेत. विभागात अपूर्ण घरकुलांची संख्या अधिक प्रमाणात आहेत. अपूर्ण घरकुले



पूर्ण होण्यासाठी तालुका व ग्राम पातळीवर अधिकारी–कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करावे. घरकुल योजनेतील अडचणी दूर करुन कामांना गती द्यावी. आवास योजनांच्या जमीनीसाठीच्या समस्या सोडविण्यासाठी कार्यवाही करण्यात यावी. गायरान जमीनीवर घरकुल बांधण्यासाठी शासनाने परवानगी दिली आहे, त्यानुसार भूमीहीन लाभार्थ्यांना घरकुलांसाठी गायरान जमिनी उपलब्ध करुन द्याव्यात. आवास योजनांच्या घरकुलांसाठी वाळू, वीटा व सिमेंट आदी एकाच ठिकाणी मिळण्यासाठी केंद्र उभारण्यात यावे. आवास योजनेंतर्गत पहिला हप्ता, दुसरा हप्ता तसेच मनरेगा अंतर्गत मिळणारा निधी लाभार्थ्यांच्या खात्यात सुरळीतरित्या जमा करण्यात यावा. मनरेगा अंतर्गत मिळणाऱ्या तरतूदीसाठी घरकुल बांधणीच्या पहिल्या दिवसापासून कुटुंबातील सदस्यांचे, मजुरांचे मस्टर नियमितपणे पूर्ण ठेवावे. या कामात कुठलिही हयगय होता कामा नये, असेही त्यांनी सांगितले. विविध आवास योजने अंतर्गत विभागाची सद्यस्थिती व अंमलबजावणी संबंधीचा आढावा मंत्री महोदयांनी यावेळी घेतला.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत विभागातील स्वयं सहाय्यता समूह, कुटुंबे, ग्राम संघ, प्रभाग संघ, उत्पादक गट, शेतकरी उत्पादक कंपनी आदीबाबत मंत्री श्री. गोरे यांनी माहिती जाणून घेतली. स्वंय सहाय्यता समुहांना बँक कर्ज वाटप, लखपती दिदी योजना, वैयक्तिक व्यवसाय उभारणी व बँकेमार्फत कर्ज पुरवठा आदीबाबत सद्यस्थितीचा आढावा त्यांनी घेतला. लखपती दिदी योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीतून महिलांना स्वयंरोजगार, व्यवसाय उपलब्ध करून द्यावा. महिलांना स्वत:चा व्यवसाय उभारण्यासाठी बँकाकडून वैयक्तिक कर्ज पुरवठ्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत. तालुका व ग्राम पातळीवर व्यवसायाच्या ठिकाणी तसेच मोक्याच्या ठिकाणी 'उमेद मार्ट' विक्री केंद्र उभारण्यात यावे, अशा सूचना मंत्री श्री. गोरे यांनी यावेळी केल्या.

राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानांतर्गत ग्रामपंचायत विकास आराखडा सन २०२५–२६, लोकप्रतिनिधींचे प्रशिक्षण व क्षमता बांधणी, पंचायत लर्निंग सेंटर्स, १५ वा वित्त आयोग प्राप्त निधी व खर्च, ब वर्ग तीर्थ क्षेत्र विकास कार्यक्रम, विभागातील अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या सेवा विषयक प्रश्न आदीबाबत मंत्री महोदयांनी आढावा घेतला. मुख्यमंत्र्यांच्या १०० दिवस विकास आराखड्यांतर्गत ग्रामविकास विभागात झिरो पेन्डंन्सी, गोर–गरीब, महिला भगिनींसाठींच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी तसेच १०० टक्के उद्दिष्टपूर्तीच्या माध्यमातून पारदर्शक व लोकाभिमूख प्रशासन म्हणून विभागाची ओळख निर्माण करण्यात यावी, असे आवाहन मंत्री श्री. गोरे यांनी यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना केले.

# 'लाडक्या बहिणी'च्या अडचणी वाढणार, बच्चू कडूंची निवडणूक आयोगाकडे चौकशीची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७अमरावती :** – 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' ही विधानसभा निवडणुकीत राज्यातील सत्ताधारी महायुतीसाठी अत्यंत लाभदायक ठरली. महायुतीला पुन्हा सत्ता मिळवून देण्यात मोलाची मदत करणाऱ्या या योजनेतील काही लाभार्थ्यांना मात्र आता लाभापासून वंचित राहावे लागू शकते, अशी चर्चा सुरू झाली. यावरून प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी सरकारवर जोरदार टीका केली आहे.

बच्चू कडू म्हणाले, निवडणुकीआधी जेव्हा लाडकी बहीण योजना लागू करण्यात आली, तेव्हा पात्र, अपात्र न पाहता लाभ देण्यात आला, पण आता निवडणूक आटोपल्यानंतर निकष लावले जात आहेत. या विरोधात लाडक्या बहिणींना खरेतर रस्त्यावर उतरावे लागेल. ही त्यांची फसवणूक आहे. लाडक्या बहिणींना सरकारने दरमहा पंधराशे रुपये देऊ केले. पण, सोयाबीन उत्पादक शेतकऱ्याला हमीभावापेक्षा २ हजार रुपये कमी किमतीत सोयाबीन विकावे लागले. इतर शेतमालाचीही हीच परिस्थिती आहे. एकीकडे गरीब भावाच्या खिशातून २ हजार रुपये काढून घ्यायचे आणि बहिणींना पंधराशे रुपये द्यायचे, तरीही सरकार पाचशे रुपयांनी नफ्यातच आहे. ही विचित्र स्थिती आहे. सरकारने सर्वसामान्य



शेतकऱ्यांचीही फसवणूक केली आहे, अशी टीका बच्चू कडू यांनी केली.

अडीच लाखांपेक्षा कमी उत्पन्न असणाऱ्या लाभार्थ्यांना लाभ दिला जाणार आहे. त्यासाठी सरकारने आयकर विभागाकडून माहिती मागवली आहे. त्यानुसार अर्जांची छाननी होईल. अडीच लाखांपेक्षा जास्त उत्पन्न असलेल्या महिला असतील, तर लाभ मिळणार नाही. चारचाकी वाहन असणाऱ्या महिलांच्या अर्जांची पडताळणी होणार आहे. त्यासाठी परिवहन विभागाकडून माहिती मागवली जाणार आहे. अशा महिला लाभ घेत असतील, तर त्यांना यापुढे लाभ मिळणार नाही. आधार कार्डवर नाव वेगळे आणि बँकेत नाव वेगळे अशा अर्जांची सुद्धा पडताळणी केली जाणार आहे. तसेच केंद्र सरकारची परवानगी मिळाल्यानंतर आधारची ई केवायसी सुद्धा केली जाणार आहे. विवाहानंतर परराज्यात गेलेल्या महिला आणि शासकीय नोकरीत असताना कोणी लाभ घेतला असेल तर अशा अर्जांची सुद्धा पडताळणी केली जाणार आहे. निवडणुकीनंतर सरकारने लाडकी बहीण योजनेचे निकष बदलल्याबद्दल बच्चू कडू यांनी आक्षेप घेतला आहे.

निवडणुकीच्या आधी लोकप्रिय घोषणा करायच्या, नंतर निकष बदलायचे, या विषयी निवडणूक आयोगाने पारदर्शक चौकशी करावी, अशी मागणी बच्चू कडू यांनी केली आहे.

# 'एसटी'च्या आजी– माजी कर्मचाऱ्यांना भेट प्रवासासाठी मोफत पास

## सवलत साध्या बससाठीच असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये मात्र नाराजी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.७नागपूर–** : एसटी महामंडळाने त्यांच्या आजी–माजी कर्मचाऱ्यांना विशेष भेट दिली आहे. त्यानुसार सेवेतील कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना २ महिन्याऐवजी ४ महिने, तर माजी कर्मचाऱ्यांना पूर्वीच्या सहा महिन्याऐवजी नऊ महिने एसटी प्रवासाचा पास मोफत मिळणार आहे. ही सवलत साध्या बससाठीच असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये मात्र नाराजी आहे.

चांद्यापासून बांध्यापर्यंत सर्वसामान्य नागरिकांच्या सार्वजनिक प्रवासी वाहतुकीचे



प्रमुख साधन म्हणून एसटीच्या प्रवासी वाहतुकीकडे बघितले जाते. एसटी महामंडळात सध्या सुमारे ८६ हजार अधिकारी–कर्मचारी कार्यरत आहेत. पती वा पत्नी, दोन मुले, आई–वडील, विधवा बहिणीला महामंडळाकडून प्रत्येक वर्षी दोनदा प्रत्येकी एक महिन्याची मोफत प्रवास पास मिळत होती. परंतु, कामगार संघटनांनी वर्षभर ही सवलत देण्याची मागणी केली. त्यासाठी बऱ्याचदा आंदोलनही केले.दरम्यान राज्य परिवहन संचालक मंडळाच्या १८ डिसेंबर २०२४ रोजीच्या बैठकीत कामगार करार २००७–२००८ मधील तरतुदीनुसार सेवेवरील कर्मचाऱ्यांना जानेवारी ते जून या पहिल्या सत्रात दोन महिने तर जुलै ते डिसेंबर या दुसऱ्या सत्रात दोन महिने अशी चार महिने मोफत प्रवास पास देण्यास मंजुरी देण्यात आली. त्याबाबतचा आदेश ४ फेब्रुवारी २०२५ रोजी निघाला. एसटीतील सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या पती वा पत्नीला वर्षातून विशिष्ट कालावधीसाठी पूर्वी सहा महिनेच मोफत पास मिळत होती. परंतु, आता ही पास नऊ महिन्यांसाठी मिळणार आहे.

### शिवाई बसमध्ये पूर्ण शुल्क, शिवशाहीत मात्र वेगळे नियम

राज्यात नुकतीच शिवाई ही ई–बससेवा सुरू झाली आहे. परंतु, या बसमध्ये पासधारकाला मोफत प्रवासाची मुभा नाही. शिवशाहीने जायचे असेल तर साधी बस आणि शिवशाही बसमधील प्रवास भाड्यातील तफावतीची रक्कम भरून प्रवास करता येतो. शिवाई बसमध्ये मात्र या पद्धतीनेही प्रवासाची मुभा नाही.

# शिक्षणमंत्री ना. दादासाहेब भुसे यांनी घेतले गाडगेबाबांच्या समाधीचे दर्शन

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.७अमरावती–** महाराष्ट्र राज्याचे शालेय शिक्षणमंत्री गुरूवारी (ता.६) अमरावती जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले असता त्यांनी श्री गाडगे महाराज समाधी मंदिर गाडगेबाबानगर अमरावती येथे भेट देऊन गाडगेबाबाच्या समाधीचे केले. दर्शन घेतले. तसेच ज्या गाडीने गाडगेबाबांनी प्रवास केला त्या गाडीचेसुद्धा त्यांनी दर्शन घेतले.यावेळेस गाडगे महाराज समाधी मंदिराचे व्यवस्थापक प्रकाश महात्मे यांनी त्यांचे शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ



देऊन स्वागततसेच गाडगे महाराज मिशनचे संचालक गजानन देशमुख यांनी गाडगेबाबांची प्रतिमा भेट दिली. याप्रसंगी अमरावती जिल्हा शिवसेना प्रमुख गोपाल पाटील अरबट, अरुण पडोळे व इतर मान्यवर उपस्थित होते.

# 'ड्रिम अमेरिका' भंगले. परत पाठवलेल्या युवकाचा अनन्वित छळ : प्यायला पाणी नाही, शौच्छासही मनाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७नागपूर**

कॅनडामध्ये वाहनचालकाची नोकरी करण्यासाठी अवैधमार्गाने गेलेल्या नागपुरातील एका युवकाचे मॅक्सिकोतून गुन्हेगारांनी अपहरण केले. या युवकाचा पैशांसाठी अतोनात छळ केला. त्याच्याकडून ५० लाख रुपये उकळले. सलग तीन दिवस पायी चालवल्यानंतर अमेरिका सीमेवर सोडून दिले. अमेरिकेने बेकायदेशीर स्थलांतरणाचा गुन्हा दाखल करून त्याला भारतात परत पाठवले. हा युवक गुरुवारी सकाळी नागपुरात पोहचला. त्याने चौकशीदरम्यान जी प्रवासकथा सांगितली ती अंगावर काटा उभा करणारी आहे. हरप्रीत सिंग लालिया (३३, बाबा बुद्धाजीनगर, पाचपावली) असे या युवकाचे नाव आहे.



अमेरिकेतून १०४ बेकायदेशीर स्थलांतरितांना लष्कराच्या विमानाने भारतात परत पाठवण्यात आले. यात महाराष्ट्रातील तीन युवकांचा समावेश आहे. यातील हरप्रीतसिंग लालिया (३३) हा नागपूरचा आहे. तो नागपुरात पोहोचताच त्याला पाचपावली पोलिसांनी ताब्यात घेतले. ठाणेदार बाबुराव राऊत यांनी त्याची चौकशी केली असता हरप्रीतने त्याची छळकथा सांगितली.तो म्हणाला, कॅनडात वाहनचालकाला चार लाख रुपये वेतन मिळत असल्यामुळे मला तेथे नोकरी करायची होती. त्यामुळे एक ट्रक विकला आणि आलेल्या पैशातून कॅनडाला जाण्याची तयारी केली. व्हिजा आणि पासपोर्ट काढले. ५ डिसेंबर २०२४ ला दिल्लीवरून सौदी अरेबीयाला पोहचलो. तेथील अधिकाऱ्यांनी नोकरीसाठी परवानगी नसल्याचे सांगून दिल्लीला परत पाठवले. नंतर पंजाबमधील गुरुदासपूर येथे नातेवाईकाच्या माध्यमातून त्याची एका दलालाशी भेट झाली. त्याने १८ लाख रुपये दिल्यास थेट कॅनडात नेण्याची हमी दिली. त्यामुळे त्याला १८ लाख रुपये दिले.दलालाने पैसे घेऊन कैरो-इजिप्तला पाठवले. तेथे अन्य १५० जण होते. त्यांनाही कॅनडाला जायचे होते. तेथे चार दिवस थांबवल्यानंतर मॉंटेरियाल येथे नेण्यात आले. तेथून लगेच स्पेनमध्ये नेण्यात आले. चार दिवस पुन्हा थांबल्यानंतर ग्वॉटेमॉलाला नेले. तेथून निकारागुवा आणि हॉंडरस या देशातून मॅक्सिकोमध्ये नेण्यात आले. मॅक्सिकोजवळील टेकॉयटन सीमेवर थांबवण्यात आले. तेथे पोलिसांनी पकडले आणि तेथील गुन्हेगारांच्या ताब्यात दिले. त्यांनी अपहरण करून एका जंगलात नेले. तेथे सर्वांना लाखोंची खंडणी मागण्यात आली, अशी माहिती हरप्रीतने प्रसारमाध्यमांना दिली.

**प्यायला पाणी नाही, शौचास मनाई**

अपहरणकर्त्यांनी बंदुकीच्या धाकावर विविध देशातील दीडशे लोकांना पकडले होते. एका नेपाळी युवकाने पैसे देण्यास नकार दिल्यामुळे त्याला गोळी घालून ठार करण्यात आले. त्यामुळे अनेकांनी पैसे जमवण्यास सुरुवात केली. यादरम्यान, अपहरणकर्त्यांनी आम्हाला जबर मारहाण केली. सर्वांना उपाशी ठेवले. पाणी पिण्यास आणि शौचास जाण्यास मनाई केली. यादरम्यान, हरप्रीतनेही भारतातील कुटुंबीय आणि नातेवाईकांशी संपर्क साधून जवळपास ५० लाख रुपये गोळा केले व ते अपहरणकर्त्यांना दिले. सर्वांना सलग तीन दिवस डोंगर-दऱ्यातून पायी चालवण्यात आले व नंतर साऊथ अमेरिकेच्या सीमेवर सोडून दिले. तेथून अमेरिका पोलिसांनी बंदी बनवले. कारागृहात डांबले. कसून चौकशी करून कैद्याप्रमाणे वागणूक दिली. हातकडी, कंबरेत साखळी आणि पायही बांधून ठेवण्यात आले. विमानातसुद्धा आम्ही अशाच स्थितीत होतो, अशी माहिती हरप्रीतने दिली.

# उत्तम ब्राम्हणवाडे याना यावर्षीचा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय पत्रकारिता पुरस्कार

## नवी दिल्ली येथे मीनाक्षी लेखी आणि सुश्री. रेचलेना यांचे हस्ते पुरस्काराचे वितरण : पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्याबद्दल झाला सन्मान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारत भूषण या राष्ट्रीय पुरस्काराचे आयोजन दरवर्षी करण्यात येत असते.यामध्ये विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नमवांतांचा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव दरवर्षी दिल्ली येथे आयोजित कार्यक्रमात करण्यात येतो यामध्ये सन २०२५ यावर्षीचा पत्रकारिता क्षेत्रातील अत्यंत प्रतिष्ठेचा समजला जाणारा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारत भूषण पत्रकारिता पुरस्कार हा अमरावती जिल्ह्यातील नांदगाव खंडेश्वर येथील पत्रकार उत्तम ब्राह्मणवाडे यांना जाहीर करण्यात आला असून तो पुरस्कार ब्राह्मणवाडे यांना नवी दिल्ली येथील नविन महाराष्ट्र सदनाच्या सभागृहामध्ये झालेल्या भव्य अशा कार्यक्रमात बहाल करण्यात आला.या पुरस्काराचे स्वरूप स्मृतिचिन्ह,प्रमाणपत्र आणि मेडल असे असून हा अत्यंत प्रतिष्ठेचा पुरस्कार माजी केंद्रीय मंत्री मीनाक्षी लेखी आणि अल्पसंख्याक




आयोगाच्या सदस्या सुश्री. डॉ.रेलचेना यांचे हस्ते बहाल करण्यात आला.यावेळी कार्यक्रमाला महाराष्ट्र,गोवा,बिहार,हिमाचल प्रदेश,जम्मू काश्मीर,उडीसा,उत्तर प्रदेश, आणि दक्षिण भारतातील विविध क्षेत्रातील व महाराष्ट्रासह अमरावती,नागपूर, यवतमाळ,वर्धा,अकोला बुलढाणा, ठाणे, मुंबई, पालघर, पुणे, औरंगाबाद चंद्रपूर, सोलापूर व आदी जिल्ह्यांतील पत्रकार,तसेच सामाजिक शैक्षणिक, कला, साहित्य सांस्कृतिक उल्लेखनीय काम करणारे पुरस्कारार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पत्रकारितेतून परिवर्तनचे काम केलेल्याना डॉ बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय पत्रकारिता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले यावेळी माजी केंद्रीय मंत्री मीनाक्षी लेखी,अल्पसंख्याक सदस्य रेंचलना यांनी उपस्थित असलेल्या सर्व पुरस्कारार्थींना यावेळी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला यावेळी मंचावर दक्षिण भारतातील सिनेअभिनेत्री नुसरत जहाँ,प्रेरणा शर्मा भाटिया,किशोर मकवान,ठाकूर चंदनसिंग राष्ट्रीय अध्यक्ष प्रधान मुख्य सरपंच ठाकूर चदनसिह,मीनाक्षी प्रेरणा शर्मा,आणि गुलशन खत्री आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.पत्रकार उत्तम ब्राम्हणवाडे याना यापूर्वी सुद्धा पत्रकारिता क्षेत्रातील अनेक पुरस्कार मिळाले असून सन २०२१ चा गोवा येथील आचार्य बाळशास्त्री जांभेकर पत्रकारिता पुरस्कार मिळालेला आहे सन २०२५ या वर्षीचा पत्रकारिता क्षेत्रातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर भारतभूषण राष्ट्रीय पत्रकारिता पुरस्कार मिळाल्याबद्दल उत्तम ब्राह्मणवाडे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# अमरावती पाठोपाठ सोमय्या यांची अकोल्यातही बांगलादेशी रोहिंग्या मुस्लिमांना विरोधात तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अकोला**

अकोला जिल्ह्यातून तब्बल १५ हजार ८४५ बांगलादेशी रोहिंग्या मुस्लिमांना जन्म प्रमाणपत्र देण्याचा घोटाळा झाल्याचा गंभीर आरोप भाजप नेते किरीट सोमय्या यांनी केला आहे.या प्रकरणात त्यांनी आज रामदास पेठ पोलीस ठाण्यात पुरावे दाखल करून बयाण नोंदवले. माहिती अधिकारात प्राप्त केलेले काही कागदपत्रे त्यांनी पोलिसांकडे सादर केली आहेत. या प्रकरणी रामदास पेठ पोलीस ठाण्यात एक गुन्हा दाखल असून त्यामध्ये तीन आरोपींना अटक केली आहे.



बांगलादेशी रोहिंग्या मुस्लिमांविरोधात भाजप नेते तथा माजी खासदार किरीट सोमय्या यांनी आक्रमक पवित्रा घेतला. किरीट सोमय्या यांनी अकोला जिल्ह्यातही बनावट जन्म प्रमाणपत्र देण्यात आल्याचा आरोप केला आहे. जिल्ह्यातून जन्म प्रमाणपत्रांचा तपशिल महसूल व वन विभागाने मागवला होता. जन्म, मृत्यू नोंदणी कायदा १९६९ मध्ये सुधारणा करून उशिरा जन्म व मृत्यू नोंदणी संबंधीचे अधिकार हे जिल्हाधिकारी व उपविभागीय अधिकारी यांना प्रदान करण्यात आले आहेत. उशिरा जन्म - मृत्यू नोंदणीमध्ये जिल्ह्यात १५ हजार ८४५ अर्ज प्राप्त झाले. त्यापैकी १० हजार २७३ प्रमाणपत्र देण्यात आले असून, १०७ नामंजूर व चार हजार ८४४ प्रलंबित आहे.

सोमय्या यांनी आणखी काही लोकांची यादी पोलिसांकडे दिली. तहसीदारांनी नियमबाह्य पद्धतीने जन्माचे दाखले दिले आहेत, असा आरोप सोमय्या यांनी केला. किरीट सोमय्या यांनी आज मूर्तिजापूर येथे देखील भेट देऊन प्रकरणाची माहिती घेतली. या प्रकरणी कारवाईला वेग आला असून जन्म प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कारवाईची टांगती तलवार आहे.

# विजेचा खेळखंडोबा : नांदगाव खंडेश्वर परिसरातील नागरिक हैराण

## दिवसा उन्ह झोंबते ; तर रात्री डास गुणगुणते : रेनुकापुर ते मंगरूळ चव्हाळा विद्युत जोडणी अद्यापही नाही

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७नांदगाव खंडेश्वर**

नांदगाव खंडेश्वर वीज वितरण कंपनीच्या ढेपाळलेल्या कारभाराने नांदगाव खंडेश्वर शहरासह ग्रामीण भागातील नागरिक हैराण झाले आहेत. वीजपुरवठा केव्हाही खंडित होतो.तो तासन्तास सुरळीत होत नाही. ग्रामीण भागातील रात्रीच्या वेळी गुल झालेली वीज दुसऱ्या दिवशीच सुरू होते. हिवाळा सुरू झाला असला तरी, उन्ह कमी झालेले नाही. पंखा बंद राहत असल्याने दिवसा चटके झोंबतात, तर रात्री कानाजवळ डास गुणगुणतात. या प्रकारामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. नांदगाव खंडेश्वर शहरातील बत्ती केव्हाही गुल होते तिचा काहीच वेळ नाही त्यामुळे नागरिक चांगलेच हैराण झाले आहेत. नांदगाव खंडेश्वर येथीलवीज वितरण कंपनीच्या स्थानिक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे दुर्लक्ष असल्याने तालुक्यात विजेची समस्या गंभीर होत चालली आहे. एकही अधिकारी, कर्मचारी हा मुख्यालयी हजर राहत नाहीत सर्वच दररोज अप, डाऊन करतात त्यांच्यावर कुणाचाही वचक राहिला नाही. विद्युत विभागात अनेक तांत्रिक बिघाड वाढत चालले आहे.त्याकडे अधिकाऱ्याचे कोणतेही लक्ष नाही.फक्त खुर्चीवर बसून दिवस काढण्यात या विभागाचे अधिकारी कर्मचारी मश्गूल




असल्याचे दिसून येत आहे. रोहित्र खराब होणे, फ्यूज उडणे असे प्रकार नित्याचे झाले आहेत. देखभाल, दुरुस्ती योग्यरित्या होत नसल्याने हा प्रश्न निर्माण झालेला आहे. कंपनीचे अधिकारी याविषयी अजिबातच गंभीर नाहीत. त्यामुळे कर्मचारीही बिनधास्त आहे. नागरिकांनी केलेल्या तक्रारी दुर्लक्षित केल्या जात असल्याचे तालुक्यांतील नागरिकांच्या तक्रारी आहेत. नांदगाव खंडेश्वर शहरासह तालुक्यात दिवसभरातवीजपुरवठा केव्हाही खंडित होतो. त्यामुळे विजेवर चालणारी उपकरणे चालत नाही. घरातील मंडळींना गर्मीमुळे त्रास होतो. लहान मुले, वृध्द मंडळींच्या आरोग्याचा प्रश्न आहे. शिवाय विजेवर चालणाऱ्या विविध व्यवसायाचाही प्रश्न आहे. सायबर कॅफे, झेरॉक्स सेंटर, कोल्ड्रिक्स, विद्युत साहित्य विक्री आदी व्यवसाय अडचणीत आले असल्याची ओरड होत आहे. नागरिकांनी तक्रारी केल्यास वरूनच वीजपुरवठा बंद असल्याचे उत्तर वीज कंपनीच्या स्थानिक कार्यालयाकडून दिले जाते. फ्यूज उडणे, रोहित्र खराब होणे या समस्येशी वरूनचा काय संबंध, असा सवाल नागरिकांमधून केला जात आहे.सिंचनासाठी केवळ चार तास वीजमोटारपंपासाठी आठ तास विजेची नियोजन करण्यात आले आहे. विद्युत कंपनीच्या नांदगाव खंडेश्वर कार्यालयाने या नियोजनाची पार वाट लावली असल्याच्या संतप्त प्रतिक्रिया तालुक्यातील शेतकऱ्यांनी दिल्या आहेत.शेतकऱ्यांना शेतातीलमोटारपंपासाठी केवळ चार तासच वीज दिली जाते. एवढ्या कमी वेळात ओलित करणे प्रत्येक शेतकऱ्याला शक्य होत नाही. अशावेळी पिके धोक्यात येण्याची भीती आहे. वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्यामुळे रोहित्र जळण्याचेप्रकारही घडत आहे. वीज कंपनीचे अधिकारी मोबाइल कॉलला प्रतिसाद देत नाही. त्यांना मुख्यालयाचीही ॲलर्जी आहे. नांदगाव खंडेश्वर,मंगरुळ चव्हाळा, पापड,लोणी टाकळी, जनुना,या वीज केंद्राच्या बाबतीतही नागरिकांच्या तक्रारी आहे. अनेक ठिकाणी खासगी वायरमन कामावरवीज कंपनीचे कर्मचारी कामात गांभीर्य दाखवत नाही. एखादा खासगी वायरमन ठेवतात. त्यांच्याकडून कामे करून घेतात. खासगी वायरमन कुशल राहात नसल्याने त्यांना अपघात होतो. मात्र वीज अभियंतेसुद्धा या विषयावर गांभीर्याने लक्ष देत नाही. अशा घटनांना आळा घालायचा असल्यास अधिकाऱ्यांवरही कारवाई केली पाहिजे, असा सूर नागरिकांमधून उमटत आहे. विजेची ही समस्या काही अंशी दूर करण्यासाठी विद्युत विभागाने गेल्या दोन वार्षयापुर्वी नेर परसोपंत तालुक्यांतील रेणुकापुर येथील सब स्टेशन वरून नांदगाव खंडेश्वर तालुक्यांतील मंगरूळ चव्हाळा पर्यंत हायटेन्शन विद्युत जोडणीचा प्रस्ताव पाठविला होता तो प्रस्ताव मंजूर सुद्धा करण्यात आला पण गेल्या दोन वर्षांपासून या कामाला सुरुवातच करण्यात आलेली नसून याबाबत नांदगाव खंडेश्वर येथील विद्युत विभागाचे अधिकारी कमालीचे उदासीन दिसून येत असून त्यांना नागरिकांच्या या समस्येशी काही देणेघेणे नसल्याचे दिसून येत आहे ते सुद्धा अप डाऊन करण्यात व्यस्त आहेत याकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची आवश्यकता आहे.

# अखेर त्या दोन महिला सावकारांविरुद्ध मोर्शी पोलिसांनी नोंदविली तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

अवैध सावकारी करणाऱ्या दोन महिला सावकारांविरोधात मोर्शी पोलिसांनी ५ फेब्रुवारी रोजी रात्री सावकारी अधिनियम २०१४ च्या कलमान्वये गुन्हा दाखल केला. सहायक निबंधक राजेश भुयार यांनी याबाबत चौकशी अहवालाअंती लेखी तक्रार नोंदविली होती. अर्चना सतिश झटाले व पुजा भरतसिंग राजपूत (दोन्ही रा. अप्पर वर्धा क्वार्टर, मोर्शी) अशी गुन्हा दाखल झालेल्या अवैध सावकारांची नावे आहेत.

मोर्शीचे सहायक निबंधक व त्यांच्या पथकाने १० जानेवारी रोजी दोन स्वतंत्र पथके गठित करून झटाले व राजपूत यांच्या घरी एकाचवेळी धाड घातली होती. दोघीच्याही घरातून अवैध सावकारी स्पष्ट करणारे दस्तावेज जप्त करण्यात आले होते. त्या कागदपत्रांची संपूर्ण तपासणी करण्यात आली. त्या जप्त कागदपत्रावरून दोन्ही महिलांनी अवैध सावकारी व्यवसाय केल्याचे स्पष्ट झाले. त्याआधारे तक्रार दाखल केली.महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ च्या कलम २३, ३९, ४२, ४५ अन्वये त्या दोन महिला सावकार दोषी ठरल्याने भुयार यांनी त्यांच्याविरुद्ध मोर्शी पोलिसात लेखी तक्रार दिली होती. अवैध सावकाराविरुद्ध व त्यातल्या त्यात दोन महिला सावकारांविरुद्ध नोंदविलेला हा यंदाच्या वर्षातील पहिलाच गुन्हा ठरला आहे.

# रिद्धपूर येथील अपघातातील आरोपीचा घेतला शिरखेड पोलिसांनी शोध

## एक महिन्यानंतर आले आरोपींला शोधण्यात पोलिसांना यश



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७शिरखेड**

रिद्धपूर येथील मोर्शी रोडवरील तिवसा फाट्यावर दिनांक ९ जानेवारी रोजी सायंकाळी सहा वाजता दरम्यान मोर्शी कडून चांदूरबाजार कडे येत असलेल्या ऑटो क्रमांक एम एच ४९ ए आर २८३८ या वाहनाला जबर धडक देऊन वाहन पलटी झाले होते. या अपघातामध्ये नंदकिशोर रामदास अडवीकर वय४५ वर्ष राहणार तुळजापूर गडी याचा जागीच मृत्यू झाला होता. त्याचबरोबर या अपघातामध्ये ऑटो पलटी होऊन शकुंतलाबाई विठ्ठलराव तांबटकर वय ७५ वर्ष राहणार शिरजगाव बंड हिचा उपचारादरम्यान मृत्यू झाला होता. तसेच या अपघात ग्रस्त टो मधील इतर प्रवासी जखमी झाले होते. या अपघातातील अज्ञात वाहन चालक पळून जाण्यात यशस्वी झाला होता. या अज्ञात वाहन चालकाचा व वाहनाचा शोध घेणे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. या अपघाताच्या तपासादरम्यान पोलिसांनी रिद्धपूर ते परतवाडा रोडवरील सर्व सीसीटीव्ही फुटेज खंगाळून काढली होती. यामध्ये बऱ्याच ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे नादुरुस्त असल्याने त्या अपघात ग्रस्त वाहनाचा शोध घेणे शक्य नव्हते. त्या अनुषंगाने शिरखेड पोलीस स्टेशनचे ठाणेदार सचिन लुले यांनी बीट अंमलदार पोलीस हेड कॉन्स्टेबल संजय वाघमारे व पोलीस हेड कॉन्स्टेबल नितेश वाघ यांनी परिसरातील आजूबाजूच्या गावांमधून अपघातातील वाहन संबंधी गुप्त बातमीदाराकडून माहिती घेण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यामध्ये एक महिन्यापूर्वी झालेल्या अपघातातील आरोपीचा शोध घेण्यात शीरखेड पोलीसांनी यश मिळवले. सदर अपघातातील वाहन शिरखेड पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या विचोरी येथील महादेव भीमरावजी टिकले यांचे वाहन असल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांनी तांत्रिक पद्धतीने तपास करून आणि पोलिसी खाकी दाखवताच आरोपीने घडलेल्या गुन्ह्याची कबुली दिली. त्यावरून पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेऊन पुढील तपास सुरू केला आहे. सदरची कामगिरी संतोष खांडेकर उप विभागीय पोलिस अधिकारी मोर्शी यांच्या मार्गदर्शनात शिरखेडचे ठाणेदार सचिन लुले यांचे नेतृत्वात पोलीस हेड कॉन्स्टेबल संजय वाघमारे पोलीस हेड कॉन्स्टेबल नीतेश वाघ यांनी पार पाडली आहे.

# नैसर्गिक आपत्ती बाधितांना ५९२ कोटींची मदत, राज्यातील ५.४० लाख शेतकऱ्यांना दिलासा

## अमरावती विभागामध्ये ७ कोटी ४० लाख रुपयांची मदत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७बुलढाणा**

मागील काळात अतिवृष्टी, पूर, अवकाळी पाऊस, वादळी वारा व गारपीट या नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या शेतकरी व अन्य घटकांना राज्य शासनाने वेळोवेळी मदत जाहीर केली होती. यातील ५ लाख ३९ हजार ६०५ लाभार्थ्यांना ५९२ कोटी ३५ लाख रुपयांची मदत देण्यात आली आहे. संबंधित लाभार्थ्यांच्या बँक खात्यात, मदत व पुनर्वसन, आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत गुरुवार, ६ फेब्रुवारीला ही रक्कम वर्ग करण्यात आली. बुलढाणा जिल्ह्यातील



६७४ लाभार्थींच्या खात्यांत १ कोटी २ लाख रुपयांची रक्कम जमा करण्यात आली. राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री तथा बुलढाण्याचे पालकमंत्री मकरंद पाटील यांनी ही माहीती दिली.

मदतीमध्ये २०२२, २०२३, २०२४ मधील अतिवृष्टी व पूर, २०२२-२०२३ व २०२३-२०२४ मधील अवेळी पाऊस, २०२३-२०२४ अतिवृष्टी, २०२३ दुष्काळ आणि जून २०१९ मध्ये वादळी वारा व गारपीट या नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या राज्यातील लाभार्थींचा समावेश आहे. अमरावती विभागामध्ये ४ हजार ६७१ लाभार्थ्यांना ७ कोटी ४० लाख रुपयांची मदत देण्यात आली आहे. यात अकोला जिल्ह्यातील ३६३ लाभार्थ्यांना ५१ लाख ९६ हजार रुपये, अमरावती जिल्ह्यातील १ हजार ६३० लाभार्थ्यांना ३ कोटी ६२, बुलढाणा जिल्ह्यातील ६७४ लाभार्थींना १ कोटी २ लाख, वाशीम जिल्ह्यातील ४०१ लाभार्थींना ४९ लाख, तर यवतमाळ जिल्ह्यातील १ हजार ६०३ लाभार्थींना १ कोटी ७४ लाख रुपयांची मदत देण्यात आली आहे.नागपूर विभागात २० हजार ८९८ लाभार्थींना २६ कोटी ४३ लाख रुपये मदत देण्यात आली आहे. यामध्ये भंडारा जिल्ह्यातील १७६ लाभार्थींना २२ लाख, चंद्रपूर ५ हजार २८८ लाभार्थींना ४ कोटी ८७ लाख, गडचिरोली ६ हजार ७५२ लाभार्थ्यांना ८ कोटी १२ लाख रुपये, गोंदिया ३ हजार १४६ लाभार्थींना ४ कोटी १२ लाख, नागपूर ३ हजार ८७४ लाभार्थींना ७ कोटी ४० लाख, तर वर्धा जिल्ह्यातील १ हजार ६६२ बाधितांना १ कोटी ६९ लाख रुपये मदत देण्यात आली आहे.

# शासकीय तुर खरेदी केंद्र सुरु करा

## कृषि उत्पन्न बाजारसमीती संचालकाची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ अमरावती**

सद्यस्थितीत शेतकऱ्यांचा तुर हा शेतमाल बाजारात येण्यास सुरुवात झालेली आहे. दोन ते तिन महिन्यापुर्वी तुर या शेतमालास सरासरी रु.११०००/– भाव होते परंतु सद्यस्थितीत जेव्हा तुर उत्पादक शेतकऱ्यांचा शेतमाल बाजारात येण्यास सुरुवात होते त्यावेळेस मात्र एकदम भाव कमी होतो. सन २०२४–२५ चे खरीप हंगामातील तुर या शेतमालाची किमान आधारभूत किंमत रु.७५५०/– आहे परंतु सद्यस्थितीत बाजारात हमी भावापेक्षा कमी भाव मिळत आहे त्यामुळे शेतकऱ्याचे आर्थीक नुकसान होत आहे. तेव्हा दोन ते तिन दिवसात तुर या शेतमालाचे खरेदी केंद्र सुरु करण्यात यावे.अशी मागणी आज कृषि उत्पन्न बाजारसमीती संचालकानी जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्या कडे केली.

शासकीय तूर खरेदीत तुर या शेतमालाची उत्पादकता परीगणना करतांनी तुर हे पिक आंतरपीक असुन प्रती हेक्टरमध्ये पुर्ण पेरा सामाईक क्षेत्र म्हणुन परिगणना करण्यात यावी जेणे करुन शेतकऱ्यांना तुर विक्रीकरतांना त्रास होणार नाही करीता शासकीय तुर खरेदी केंद्र सुरु करावी अशी मागणी जिलाधिकारी सौरभ कटियार यांना निवेदनद्वारे करण्यात आली. यावेळी सभापती हरीश मोरे, संचालक नानाभाऊ नागमोते, किशोर चांगोले, प्रकाश काळबांडे, श्रीकांत बोंडे, प्रवीण अळसपुरे, प्रमोद इंगोले, बंडू वानखडे, प्रकाश कोकाटे तसेच इतर संचालक मंडळ उपस्थित होते.

# परतवाडा शहरात क्रिकेट सट्टेबाजीची मोठी उलाढाल - प्रशासन डोळेझाक करतंय?

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ अचलपूर**



परतवाडा शहरात क्रिकेटसाठी वाढत चाललेली क्रेझ आणि सट्टेबाजीचं जाळं दिवसेंदिवस अधिकच बळकट होत आहे. विशेषतः इंडियन प्रीमियर लीग (IPL) सुरू होताच देशभरातील सट्टेबाजीचा बाजार तेजीत येतो. परतवाडा शहरही याला अपवाद नाही. शहरातील रवी नगर, सिंधी कॅम्प, श्याम टॉकीज, मिश्रा लाईन आणि स्टॉप एरिया येथे क्रिकेट सट्टेबाजीचा जोर वाढलेला दिसून येतो.

आता महिला प्रीमियर लीग (WPL) क्रिकेट स्पर्धा १४ फेब्रुवारीपासून सुरू होत असल्याने पुन्हा एकदा क्रिकेट सट्टेबाजीचे वर्चस्व दिसून येणार आहे. क्रिकेट सामन्यांदरम्यान सट्टेबाजीच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असल्याचे बोलले जाते.

**प्रशासनाचे दुर्लक्ष मोठे सट्टेबाज निर्धास्त**

परतवाडा शहरात काही वर्षांपूर्वी काही छोट्या सट्टेबाजांवर पोलिसांनी कारवाई केली होती. मात्र, मोठ्या सट्टेबाजांवर कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. एलसीबी (लोकल क्राईम ब्रँच) आणि पोलिस विभागाला या सट्टेबाजीच्या अड्ड्यांची पूर्ण कल्पना असतानाही त्यांच्याकडून कोणतीही ठोस पावले उचलली जात नाहीत. सट्टेबाजीच्या माध्यमातून अनेक तरुण आर्थिक अडचणीत येत आहेत. काहींनी कर्ज काढून मोठ्या पैशांची सट्ट्यात गुंतवणूक केली असून, त्याचा फटका संपूर्ण कुटुंबाला बसतो. तरीही प्रशासन याकडे डोळेझाक करत असल्याची नागरिकांत नाराजी आहे.

**ऑनलाइन सट्टेबाजीचा वाढता प्रभाव**

पूर्वी क्रिकेट सट्टेबाजी मुख्यतः एका ठरावीक ठिकाणी बसून केली जात असे. मात्र, आता ऑनलाइन सट्टेबाजीच्या वाढत्या प्रभावामुळे सट्टेबाज मोबाईल ॲप्स, व्हॉट्सॲप ग्रुप आणि इतर डिजिटल माध्यमांचा वापर करून व्यवहार करत आहेत. यामुळे पोलिसांना हे सट्टेबाज शोधणे कठीण जात आहे.

IPL आणि WPL स्पर्धेदरम्यान शहरात दररोज लाखो रुपयांची उलाढाल होते. मोठे सट्टेबाज आपली पकड मजबूत ठेवण्यासाठी वेगवेगळ्या नेटवर्कचा वापर करतात. काही स्थानिक एजंट हे पैसे गोळा करण्याचे काम करतात आणि मोठ्या बुकी पर्यंत ते पोहोचवतात.

**नागरिकांनी सावधगिरी बाळगण्याची गरज**

परतवाडा शहरातील नागरिकांनी आणि विशेषतः तरुणांनी या सट्टेबाजीपासून दूर राहण्याची गरज आहे. पोलिसांनी देखील कठोर कारवाई करून या बेकायदेशीर धंद्याला आळा घालावा, अशी मागणी नागरिक करत आहेत. प्रशासनाने जर वेळीच उपाययोजना केल्या नाहीत, तर भविष्यात ही समस्या आणखीनच मोठी होऊ शकते.असे लोकांचे म्हणणे आहे.

# ‘व्हॅलेंटाइन डे’निमित्त हटके गिफ्टला पसंती : तरुणाईला लागले वेध, शहरात बाजारपेठेतील दुकाने विविध वस्तूंनी सजली

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अमरावती**

व्हॅलेंटाइन डे आठ दिवसांवर आला आहे. मात्र, तरुणाईला आतापासूनच त्याचे वेध लागले . व्हॅलेंटाइन डेची तयारी सुरू झाली असून, आपल्या आवडत्या व्यक्तीला ‘हटके’ गिफ्ट देण्यासाठी ऑनलाईन खरेदीला तरुणाई प्राधान्य देताना दिसत आहे.




व्हॅलेंटाइन विकला शुक्रवार ७ फेब्रुवारीपासून सुरूवात होत असून, तरुणाईला व्हॅलेंटाइन डेचे वेध लागले आहेत. पूर्वी केवळ एक दिवस साजरा होणारा हा दिवस ऑनलाइन गिफ्ट खरेदी करताना बऱ्याचदा विदेशी व ब्रँडेड उत्पादनांचा प्राधान्याने विचार केला जातो. त्यात डिजिटल फ्रेम, व्हिडीओ फ्रेम्स, मेकअप किट्स, फोटो असणारे फोन कव्हर्स, कपल ब्रेसलेट्स व रिंग्ज यांचा समावेश आहे. याशिवाय सरप्राइज प्लॅनिंगलादेखील तरुणाई अधिक महत्त्व देताना दिसते.आपल्या आवडत्या व्यक्तीला गिफ्ट देताना त्यात आपलेपणा वाटावा म्हणून कस्टमाइझ केलेल्या वस्तू भेट देण्याकडे तरुणाईचा अधिक कल दिसून येत आहे. सध्या व्हॅलेंटाइन वीकसाठी मेसेज पिल्स, आर्टिफिशियल फ्लॉवर, शो पिस, टेडी, आर्टिफिशियल ज्वेलरी, ज्वेलरी बॉक्स, चॉकलेट्स यासह कस्टमाईझ्ड केलेले मग्स, वॉच, पिलो कव्हर, पेन, यासारख्या गिफ्ट्सला अधिक पसंती मिळत आहे.

# ‘डिजिटल अरेस्टर्स’ना दणका; देशातील ७७ हजार व्हॉट्सप क्रमांक ब्लॉक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.७नागपूर**

देशभरात ‘डिजिटल अरेस्ट’च्या नावाखाली नागरिकांना गंडा घालण्याचे प्रमाण वाढले आहे. याबाबत केंद्रीय गृहमंत्रालयाने पावले उचलली असून, ‘आयफोरसी’च्या (इंडियन सायबर क्राइम को–ऑर्डिनेशन सेंटर) माध्यमातून देशातील सायबर गुन्हेगारांच्या ७७ हजारांहून अधिक क्रमांकाचा शोध लावून त्यांचे व्हॉट्सप ब्लॉक केले आहे. तसेच ‘स्काइप’च्या हजारो खात्यांवरदेखील कारवाई करण्यात आली आहे.

पोलीस, सीबीआय, ईडी किंवा कस्टममधील अधिकारी असल्याची बतावणी करत सायबर गुन्हेगार नागरिकांना ‘डिजिटल अरेस्ट’ करतात.




**व्हिडीओ कॉलिंगसाठी ‘स्काइप’चा वापर**

या स्कॅमसमधील व्हॉइस व व्हिडीओ कॉलिंगसाठी सायबर गुन्हेगार प्रामुख्याने व्हॉट्सप कॉलिंग व स्काइपचा उपयोग करतात. ‘आयफोरसी’ने मागील काही महिन्यांत आलेल्या तक्रारींच्या तपासादरम्यान सायबर गुन्हेगारांच्या ७७ हजार १९५ व्हॉट्सप क्रमांकांचा शोध लावला व त्यांना ब्लॉक केले. याशिवाय ३ हजार २५५ स्काइप खातीदेखील ब्लॉक केली आहेत. ऑनलाइन गंडा घातल्यानंतर सायबर गुन्हेगार विविध बँक खात्यात रक्कम वळती करतात. यातील बहुतांश बँक खाती ही गरीब लोकांकडून भाडेतत्त्वावर व नकळतपणे घेतलेली असतात.

या खात्यांचे पासबुक, एटीएम कार्ड सर्व सायबर गुन्हेगारांच्या टोळीकडेच असते. ‘लोकमत’ने ही ‘मोडस ऑपरेंडी’ मागील वर्षीच बाहेर आणली होती. या खात्यांना शोधण्यासाठी ‘सीएफएमसी’ची (सायबर फ्रॉड मिटिगेशन सेंटर) स्थापना केली असून त्यात मोठ्या बँका, वित्तीय संस्था, पेमेंट अग्रिगेटर्स, टेलिकॉम कंपन्या, आयटी तज्ज्ञ व विविध राज्यांच्या एजन्सीजचे प्रतिनिधी सहभागी आहेत. आतापर्यंत ‘सीएफएमसी’ने ९.२३ लाख ‘म्युच्युअल अकाउंट्स’चा शोध लावला आहे.

**सात लाखांहून अधिक सिमकार्डदेखील ब्लॉक**

देशभरातील सात लाखांहून सिमकार्ड ब्लॉक करण्यात आले आहेत, तर २.०८ लाख आयएमईआय क्रमांकांचा शोध लावत ते मोबाइलदेखील ब्लॉक केले आहेत. सायबर गुन्हेगारांकडून एकाच वेळी हजारो सिमकार्डचा उपयोग करण्यात येत असतो.

**हे आहेत डिजिटल अरेस्ट स्कॅमचे ‘हॉटस्पॉट’**

मेवात, जामतारा, अहमदाबाद, हैदराबाद, चंडीगड, विशाखापट्टणम, गुवाहाटी येथे डिजिटल अरेस्ट स्कॅमचे हॉटस्पॉट्स आहेत. या हॉटस्पॉट्ससाठी सात ‘जॉइंट सायबर कोऑर्डिनेशन टीम्स’ स्थापन करण्यात आल्या आहेत.

# सिंचनसाठी बोअरच; शेतकऱ्यांना विहिर नको : अनुदानात बोअरच हवाय

## अनेक शेतकऱ्यांची बोअरवेललाच पसंती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ७ अमरावती**



शेतकऱ्यांना सिंचन सुविधामिळण्यासाठी राज्य शासनाच्या धडकसिंचन विहीर व डॉ. बाबासाहेब आंबेडकरकृषी स्वालंबन सिंचन यासारख्या योजनाआहेत. शेतकऱ्यांना या माध्यमातूनसिंचन सुविधेच्या विहीर बांधकामासाठीजवळपास अडीच लाख रुपयांपर्यंतअनुदान दिले जाते. मात्र विहीरबांधकामासाठी शेतकऱ्यांना करावीलागणारी कसरत, सिमेंट, लोखंड व इतरवस्तूंचे कमालीचे वाढलेले भाव, मजूरदार,खोदकाम करताना दगड लागल्यास विहिरीचे अर्धवट पडलेले बांधकाम आणिउन्हाळ्यात पाण्याची पातळी खोलातजात असते. त्यामुळे विहिरी कोरड्यापडत असल्याने विहिरी निरुपयोगी ठरतआहेत.

त्यामुळे शेतकरी बोअरमारण्याचा पर्याय स्वीकारत आहे.शासनानेही विहिरीऐवजी बोअरदेण्याची मागणी शेतकऱ्यांकडून केलीजात आहे. मोठ्या शेतकऱ्यांचासिंचनासाठी बोअर मारण्याकडे मोठाकल दिसून येत आहे. तालुक्यातील नदी,नाले, तलाव उन्हाळ्याच्या दिवसातकोरडे पडत असतात. शासनातर्फेविहिरीसाठी अडीच लाखांपर्यंचे अनुदानदिले जाते. मात्र विहिरी ३० ते ३५ फूटखोदून सुद्धा पाहिजे त्या प्रमाणात पाणीलागत नाही.

**बोअरचे खोदकाम करणे सोयीचे**

शेतात जवळपास एक फूट व्यासाचा बोअर मारण्यासाठी ८० ते ९० हजार रुपयांचाखर्च येतो. आणि तालुक्यात विहिरीपेक्षा बोअरचे खोदकाम करणे सोयीचे आहे,बोअरची पाणीपातळी खोल राहत असल्याने उन्हाळ्यातही पाणीटंचाई जाणवत नाही.त्यामुळे सरकारने आता शेतकऱ्यांना बोअरच्या खोदकामासाठी अनुदानावर योजनाअंमलात आणावी. जेणेकरून शेती सिंचनाची समस्या मार्गी लागण्यास मदत होईल असा शेतकऱ्यांचा चर्चेतील सूर आहे.

**विहीर बांधणेच झाले बंद**

एरवी सधन व मोठ्या शेतकऱ्यांनीसिंचनासाठी अलीकडे विहीर बांधतानाहोणाऱ्या त्रासामुळे विहीर बांधनेच बंदकेले असून शेतात बोअर मारण्याकडेशेतकऱ्यांचा मोठा कल सध्या दिसून येतआहे. तालुक्यातील एकट्यासावरगावात मागील काही वर्षात शेकडोशेतकऱ्यांनी शेतात बोअर मारले असूनउन्हाळी पिकाचे उत्पादन घेतआहेत.

**विहिरीच्या तुलनेत बोअरखोदायला खर्च कमी**

साधारणतः एक विहीर बांधायला अडीचलाख रुपयांचा खर्च येतो. तर बोअरचाखर्च त्या तुलनेत अतिशय कमी येतो.एका विहिरीच्या खर्चात दोन बोअर होऊशकतात. एका विहिरीने एकाशेतकऱ्याचा फायदा होईल, तर त्याचखर्चात दोन शेतकऱ्यांचा फायदा होऊशकतो. शिवाय विहिरीसाठी वेळ, पैसाआणि दगदग सोसावी लागणार नाही.शासनाचे पैसेसुद्धा वाचतील आणिबोअरद्वारे मुबलक सिंचनाची सुविधाउपलब्ध होईल. बोअर मारण्यासाठीवेळही लागत नाही. अलीकडे मजूरसापडत नसल्याने विहिरीचे खोदकामकरणे फार कठीण झाले आहे.

# शाळेतील गोडखिचडी व अंडापुलाव करिता गुरूजीला मागावी लागणार माधुकरी

## लोकसहभागातून गोडखिचडी व अंडापुलाव देण्याच्या सूचना

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७ अमरावती**

प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत इयत्ता १ली ते ८ वी च्या विद्यार्थ्यांना द्यावयाच्या मध्यान्ह भोजनातील पाककृतीमध्ये बदल करण्यात आला असून नवीन पाककृतीमधील पर्यायी असलेल्या गोड खिचडीतील साखर व अंडापुलाव करिता अंडी खरेदीसाठी लोकसहभाग म्हणून शिक्षकांना गावात माधुकरी मागावी लागणार आहे. त्यामुळे आता आचार्य नव्हे आचारी , गावात मागतो माधुकरी असे म्हणण्याची वेळ आली आहे.



शासनाच्या शालेय शिक्षण विभागाकडून याबाबत नुकत्याच निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयात एकूण बारा नवीन पाककृती निश्चित करण्यात आल्या आहेत , त्यापैकी १० पाककृतीमधून जि. प. स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील समिती ला आठवड्यातील दरदिवशीची पाककृती निश्चित करायची आहे. परंतू बारा पाककृती पैकी गोड खिचडी व अंडा पुलाव या दोन पाककृती पर्यायी स्वरूपाच्या असणार आहे. त्याकरीता शिक्षकांना लोकसहभाग मिळवून त्या निधीतून विद्यार्थ्यांना गोड खिचडी अव अंडा पुलाव द्यायचा आहे.

विशेष म्हणजे शासनाच्या यापुर्वीच्या शासन निर्णयातील पाककृतीनुसार विद्यार्थ्यांना आठवड्यातून एकदा गोड खीर व अंडी दिल्या जात होती , तसेच दररोज ठराविक प्रमाणात मोड आलेले कडधान्य देण्यात येत होते. त्याकरिता शासनाकडून अनुदानही उपलब्ध करून दिल्या जात होते.

परंतू या पाककृती किचकट स्वरूपाच्या असल्याने त्यामध्ये बदल करण्याबाबत शिक्षक संघटना , पालक संघटना , स्वयंपाकी ,मदतनीस , बचत गट यांचेकडून निवेदने देण्यात आली होती. अलिकडेच शालेय शिक्षण विभागाकडून एक शासन निर्णय निर्गमित करून नविन पाककृती निश्चित केल्या आहे , परंतू यातील गोडखिचडी व अंडापुलाव यासारख्या पर्यायी पाककृती मात्र अडचणीच्या ठरणार आहेत.

विद्यार्थ्यांना शाळेत मध्यान्ह भोजन देण्याबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश आहेत. असे असताना महाराष्ट्रासारख्या पुरोगामी व विकसीत समजल्या जाणा–या राज्याकडून विद्यार्थ्यांच्या भोजनाकरिता शिक्षकांना लोकसहभागातून निधी उभारावा लागणार असे तर ही बाब अनाकलनीय आहे, तेवढीच दुर्दैवी पण आहे. प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत मध्यान्ह भोजनातील सर्व पाककृती करिता शासनाकडून पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात यावा , तसेच ही संपूर्ण योजना स्वतंत्र यंत्रणेमार्फत राबविण्यात यावी अशी मागणी आहे.

# अन्न पुरवठा विभागाच्या गलथान कारभारामुळे गरीब वंचित, दलालांची चलती : दक्षता समिती निष्क्रिय, शिधापत्रिका प्रकरणे प्रलंबित

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.७अचलपूर**

केंद्र सरकारच्या अन्न सुरक्षा योजनेचा अचलपूर तहसील कार्यालयाच्या पुरवठा विभागात सर्रास गैरवापर केला जात आहे. गरजू आणि पात्र लाभार्थ्यांना वगळून सधन आणि प्रभावशाली लोकांना सवलतीच्या दरात धान्य पुरवले जात असल्याचे आरोप होत आहेत. शिधापत्रिकेवर (राशन कार्ड) नंबर टाकणे किंवा नवीन नाव समाविष्ट करणे यासारख्या साध्या प्रक्रियांसाठीही नागरिकांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. मात्र, तहसील पुरवठा अधिकारी या समस्येकडे दुर्लक्ष करत असून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे, या संपूर्ण प्रकाराकडे तालुका दक्षता समितीने डोळेझाक केली आहे.

१५७ शासकीय धान्य दुकानांवर कोणाचेही नियंत्रण नाही

अचलपूर तालुक्यात एकूण १५७ शासकीय रेशन दुकाने आहेत. या दुकानांवर तहसील पुरवठा विभागाने सतत लक्ष ठेवले पाहिजे. मात्र, सद्यस्थितीत हे अधिकारी पूर्णतः दुर्लक्ष करत असल्याचे स्पष्ट होत आहे. याचे ठळक उदाहरण म्हणजे निजामपूर गावातील एका निराधार मूकबधिर महिलेचे प्रकरण.

सदर महिला २०२० मध्ये एका सरकारी शिबिराद्वारे शिधापत्रिकेसाठी पात्र ठरली. मात्र, पाच वर्षे उलटूनही तिच्या राशन कार्डवर आरसी नंबर टाकण्यात आलेला नाही. त्यामुळे अंत्योदय अन्न सुरक्षा योजना, महात्मा फुले जन आरोग्य योजना आणि प्रधानमंत्री आयुष्मान योजनेचे लाभ देखील तिला मिळू शकलेले नाहीत.



मूकबधिर असल्याने तिला या प्रक्रियेची पुरेशी माहिती मिळत नाही. तिच्या नातेवाईकांनी अनेकदा पुरवठा कार्यालयात अर्ज केले, मात्र वारंवार बहाणे सांगून प्रकरण लांबणीवर टाकण्यात आले. एका कर्मचाऱ्याला विनंती करूनही आरसी नंबर देण्यात आले नाही, परिणामी सदर महिला अजूनही सवलतीच्या दरातील धान्यासाठी वणवण फिरत आहे.

**पुरवठा विभाग दलालांच्या ताब्यात?**

स्थानिक नागरिकांच्या मते, पुरवठा विभागात दलाल सक्रिय आहेत, जे पैशांच्या जोरावर धनाढ्य आणि प्रभावशाली लोकांचे काम त्वरित करून देतात, तर गरीब आणि गरजू नागरिकांना महिनोन्महिने टाळाटाळ केली जाते. मूकबधिर महिलेच्या प्रकरणाने प्रशासनाची असंवेदनशीलता समोर आणली आहे. ती तीन वेळा पुरवठा विभागाच्या कार्यालयात गेली, मात्र काम होईल असे सांगून तिला परत पाठवण्यात आले. तालुका दक्षता समितीच्या निष्क्रियतेमुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप आहे. ही समिती नक्की कोणावर लक्ष ठेवते? गरीब आणि गरजूंच्या हक्कांचे संरक्षण करण्याची जबाबदारी त्यांची नाही का?

**जिल्हाधिकाऱ्यांकडून हस्तक्षेपाची मागणी**

बच्चू कडू व प्रवीण तायडे यांच्याकडून दखल घेण्याची अपेक्षास्थानिक नागरिकांनी जिल्हाधिकारी कटियार आणि जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी त्वरित लक्ष घालावे, अशी मागणी केली आहे. तसेच माजी आमदार बच्चू कडू आणि आमदार प्रवीण तायडे यांनी या गंभीर प्रकरणाची दखल घ्यावी आणि या मूकबधिर महिलेचा त्वरित न्याय मिळावा, अशी नागरिकांची अपेक्षा आहे.

सदर महिलेच्या राशन कार्डवर आरसी नंबर लावून तिला अन्न सुरक्षा योजनेचा लाभ मिळेल याची खात्री प्रशासनाने करावी. तसेच, पुरवठा विभागात सुरु असलेल्या दलाली आणि भ्रष्टाचाराची सखोल चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशीही नागरिकांची मागणी आहे.

प्रशासन आता कोणती ठोस पावले उचलते, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल. अन्यथा, गरिबांना त्यांच्या हक्कांसाठी असेच संघर्ष करावा लागेल.